RNI- MAHMAR2003/14666
L/130/RNP/Renewal/2021-23
SHIV VANI

# शिव वाणी

सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी

बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २२ वे | अंक ३२ | सोमवार दि.२५ ऑगस्ट २०२५ | Mo.9422748792/ 9822628521 | पाने : ४ | किंमत ०३ ₹

Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-22 | Issue -32 | MONDAY DT 25 AUGUST 2025 | RNI- MAHMAR2003/14666 | PAGES - 4 | PRICE - 3 RUPEES

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# राज्यात २६ लाख ३४ हजार लाडक्या बहिणी अपात्र

मुंबई : महाराष्ट्रातील लाडकी बहीण योजनेत मोठ्या प्रमाणात अपात्र लाभार्थ्यांचा समावेश असल्याचे समोर आले आहे. राज्यात एकूण २६ लाख ३४ हजार महिला या योजनेत अपात्र ठरल्या आहेत.

पुणे, ठाणे, नाशिक, अहमदनगर आदी जिल्ह्यांमध्ये मोठ्या संख्येने अपात्र लाभार्थी आढळून आले आहेत. यामुळे योजनेच्या अंमलबजावणीत गोंधळ निर्माण झाला आहे आणि सरकारी निधीचा गैरवापर झाल्याची शक्यता आहे. राज्यात २६ लाख ३४ हजार अपात्र लाडक्या बहिणी आहेत. यापैकी उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या पुणे जिल्ह्यात २ लाख ४ हजार महिला लाडकी बहीण योजनेतून अपात्र ठरल्या आहेत. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या ठाणे जिल्ह्यात १ लाख २५ हजार अपात्र लाडक्या बहिणी आहेत.

राधाकृष्ण विखे पाटलांच्या अहिल्यानगरात देखील २५ हजार ७५६ लाडक्या बहिणी अपात्र असून त्यांनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे. नाशिकमध्ये १ लाख ८६ हजार ८०० महिला अपात्र ठरल्या आहेत. मंत्री संजय शिरसाट यांच्या छत्रपती संभाजीनगरमध्ये १ लाख ४ हजार ५०० बहिणी अपात्र ठरल्या आहेत. नागपुरात ९५ हजार ५०० अपात्र लाडक्या बहिणींनी योजनेचा लाभ घेतलेला आहे.



## लाडकी बहीण योजनेच्या गैरवापराची चौकशी करणार

नागपूर : लाडकी बहीण योजने'च्या गैरवापराची चौकशी सुरू आहे. ज्या लाभार्थ्यांनी चुकीच्या मार्गाने या योजनेचा लाभ घेतला आहे, त्यांचा लाभ बंद केला जाईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

रविवारी सातनवरी येथे एका कार्यक्रमानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. मुंबई, पुणे आणि इतर मोठ्या शहरांमध्ये सुमारे २६ लाख महिलांनी या योजनेचा गैरवापर केल्याबद्दल त्यांना विचारण्यात आले असता फडणवीस म्हणाले की, या प्रकरणात सरकारकडून चौकशी सुरू आहे. जे लाभार्थी चुकीच्या पद्धतीने लाभ घेत आहेत त्यांचा लाभ थांबवण्यात येणार आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही मतांची चोरी झाल्याचा मुद्दा उपस्थित

(उर्वरीत पान २ वर)

# घारेगावच्या सुखना नदीत वाळू भरताना पाच ट्रॅक्टर जप्त....!

## पाचोड पोलीस स्टेशनची कारवाई .....!

पैठण ।प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील घारेगाव येथील सुखना नदीमध्ये महसूल चुकवून विना रॉयल्टीचे विना नंबरचे ट्रॅक्टर मध्ये वाळू भरीत असताना सकाळी ११ वाजेच्या सुमारास घारेगावच्या सुखना नदीमध्ये पोलिसांनी छापा मारला दि.२३/.२०२५ रोजी वेळ ११-०० वाजेच्या सुमारास पोलिस ठाणे पाचोड येथे आडुळ बीट मध्ये पोलिस ठाणे प्रभारी अधिकारी स.पो.नि पंडीत साहेब यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि नाईकवाडे ,पोहवा दुलत १३३८ व सोबत होमगार्ड स्टाफ यांनी मिळुन गुप्त बातमीदार यांचे द्वारे मिळालेल्या माहीती वरुन घारेगाव



येथे सुखना नदि पात्रात जवळ एकुण पाच आरोपी ट्रॅक्टर मध्ये वाळू भरताना पोलिसांनी जागेवर पकडले त्यांच्या जवळील साहित्य खोरे टोपले ट्रॅक्टर पाचोड पोलीस स्टेशनमध्ये जमा करण्यात आले त्यांचे ताब्यातील विना क्रमांकाचे ट्रॅक्टर मध्ये त्यांचे जवळ वाळु वाहतुक करण्याचा कोणताही शासकीय परवाना नसतांना स्व:ताच्या फायद्या करिता वाळुची चोरटी विक्री करण्याचे उद्देश्याने अवैध वाळु वाहतुक करतांना

(उर्वरीत पान २ वर)

# गोंदीतील वाळू तस्कर सुयोग सोळुंके एमपीडीए अंतर्गत स्थानबद्ध, गुन्हेगारीवर पोलिसांचा मजबूत अंकुश

जालना / फारुक शेख

जालना जिल्ह्यात गंभीर गुन्हेगारांविरोधात सुरू असलेल्या सशक्त पोलिस मोहिमेअंतर्गत गोंदी येथील वाळू तस्कर सुयोग उर्फ सुशील मधुकर सोळुंके (वय ३६, रा. गोंदी, ता. अंबड) याला 'महाराष्ट्र प्रतिबंधक अधिनियम' अंतर्गत २३ ऑगस्ट २०२५ रोजी ताब्यात घेऊन छत्रपती संभाजीनगर येथील हर्सुल मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले आहे.सदर आरोपीविरुद्ध गौण खनिज वाळू चोरीसारखे अनेक गंभीर गुन्हे दाखल असून, याआधीही त्याच्यावर विविध प्रतिबंधक कारवाया करण्यात आल्या होत्या. मात्र त्याने गुन्हेगारी थांबवण्याऐवजी त्यात अधिक गडबड वाढवली. त्यामुळे गोंदी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. आशिष खांडेकर यांनी चझऊ- अंतर्गत प्रस्ताव तयार करून जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केला होता.जिल्हाधिकारींची मंजुरी, कारागृहात थेट रवानगी!



### एमपीडीए अंतर्गत होणारी ही कारवाई ठरतेय इतर गुन्हेगारांसाठी इशारा

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल खांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये स्थानीय गुन्हे शाखा व गोंदी पोलीस ठाणे यांच्या कर्मचाऱ्यांचा मोलाचा सहभाग होता.

प्रस्तावाची सखोल तपासणी केल्यानंतर मा. जिल्हादंडाधिकारी यांनी या प्रस्तावाला मान्यता दिली आणि आरोपीस हर्सुल कारागृहात स्थानबद्ध करण्याचे आदेश काढले. आदेशानंतर आरोपीस ताब्यात घेऊन त्याला थेट मध्यवर्ती कारागृह, हर्सुल (छत्रपती संभाजीनगर) येथे रवाना करण्यात आले.

कार्यवाहीत सहभागी अधिकारी व कर्मचारी:

स्थानीय गुन्हे शाखा: पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि योगेश उबाळे, सचिन खामगळ, आशिष खांडेकर, पोउपनि के. आर. हावले, पोउपनि बालाजी पदमने अंमलदार रुस्तुम जवळ, प्रभाकर वाघ, रमेश राठोड

(उर्वरीत पान २ वर)


# ७ सप्टेंबर रोजी बीडमध्ये लातूरचे खासदार डॉ.शिवाजी काळगे आणि उमरगाचे आमदार प्रवीण स्वामी यांच्या नागरी सत्काराचे आयोजन - वैभव स्वामी

## पाच शिवाचार्यांसह प्रशासकीय अधिकारी आणि शिक्षकांचा देखील राज्यस्तरीय पुरस्काराने होणार सन्मान !



बीड ।प्रतिनिधी

रविवार दिनांक ७ सप्टेंबर रोजी वीरशैव स्वामी समाजाच्या वतीने बीड येथे लातूरचे खासदार डॉक्टर शिवाजी काळगे आणि उमरगाचे आमदार प्रवीण स्वामी यांचा नागरी सत्कार आयोजित केला आहे. यावेळी बीड जिल्ह्यातील ५ शिवाचार्यांचा देखील यथोचित सन्मान करण्यात येणार असून त्यांच्या शुभहस्ते सत्कारमूर्तींचा सन्मान करण्यात येणार आहे.स्वामी समाजामधील प्रशासकीय अधिकारी आणि फक्त बीड जिल्ह्यातील स्वामी जंगम असलेल्या शिक्षकांचा देखील सन्मान करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील अनोख्या पद्धतीने आदर्शवत होणाऱ्या या कार्यक्रमाला बीड जिल्ह्यातील वीरशैव स्वामी जंगम समाजाने उत्स्फूर्तपणे उपस्थित राहावे असे आवाहन जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजक वैभव जगदेवी विवेक स्वामी यांनी केले आहे.



### स्वामी जंगम समाजातील शिक्षकांचा होणार सन्मान...

५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन सर्वत्र साजरा केला जातो. या शिक्षक दिनाचे औचित्य साधून या नागरी सत्कार सोहळ्यामध्ये लातूरचे खासदार डॉक्टर शिवाजी काळगे आणि उमरगा विधानसभेचे आमदार प्रवीण स्वामी या दोन सत्कारमूर्तींच्या शुभहस्ते, शिवाचार्यांच्या शुभाशीर्वादामध्ये आणि उपस्थित प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या सानिध्यात फक्त बीड जिल्ह्यातील स्वामी जंगम समाजातील शिक्षकांना श्रीसंत शिरोमणी मन्मथ स्वामी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात येणार आहे. हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी स्वामी जंगम समाजातील फक्त बीड जिल्ह्यात कार्यरत असलेल्या शिक्षकांनी सत्कार स्वीकारण्यासाठी आपला पासपोर्ट फोटो आणि माहिती पाठवून ९९ ६० ४६ ३२ ४४ या व्हाट्सअप नंबर वर संपर्क करावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

बीडमध्ये पहिल्यांदाच वीरशैव लिंगायत स्वामी जंगम समाजाच्या वतीने लातूरचे नवनिर्वाचित खासदार डॉ. शिवाजी काळगे आणि उमरगा येथील आमदार प्रवीण स्वामी यांच्यासह प्रशासनातील प्रशासकीय अधिकारी आणि शिक्षकांचा सन्मान सोहळा रविवार दिनांक ७ सप्टेंबर २०२५ रोजी हॉटेल नीलकमल, नगर रोड, बीड येथे आयोजित

(उर्वरीत पान २ वर)



जाहिरातदारांना विनम्र आवाहन...!

दै. समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
६ वा वर्धापन दिन विशेषांक-२०२५

स.न.वि.वि.
मागील ५ वर्षांपासून मराठवाडा स्तरावर प्रकाशित होणारे शासनमान्य यादीवरील 'दै.समर्थ राजयोग' चा ६ वा वर्धापन दिन शुक्रवार दि.५ सप्टेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात येणार आहे. आजपर्यंत आपल्या पाठवळावर कणखर बाणा कायम ठेवून निर्भीडपणे लिखन करत वृत्तपत्र वाचकांच्या विश्वासाला पात्र ठरले आहे. या निमित्ताने आम्ही 'वर्धापन दिन विशेषांक २०२५' चा विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेषांकामध्ये आपल्या संस्थेची प्रतिष्ठाणची, व्यवसायाची अथवा वैयक्तिक जाहिरात देवून वृत्तपत्राला भक्कम आर्थिक साथ द्यावी ही नम्र विनंती.

जाहिरातीचे ऑनलाईन पेमेंट पाठवण्यासाठी
गुगल पे/फोन पे नंबर 9822628521
दै.समर्थ राजयोग
बँक : बँक ऑफ महाराष्ट्र
A/c No. - 60392843322
IFC Code - MAHB0001689
MICR Code - 431014303

जाहिरात दरपत्रक

| अ.क्र | विवरण | साईज | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | रंगीत | पूर्ण पान | ४०,०००/- |
| २. | रंगीत | अर्धे पान | २०,०००/- |
| ३. | रंगीत | पाव पान | १०,०००/- |
| ४. | रंगीत | शुभेच्छा | ५,०००/- |

₹5000/- ची जाहिरात देऊन वार्षिक वर्गणीदार विनामुल्य व्हा...!
जाहिरात पाठविण्यासाठी संपर्क
वैभव जगदेवी विवेक स्वामी
संपादक - मो.9822628521
दै.समर्थ राजयोग
सम्राट चौक, शाहुनगर, बीड
Email : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वाचकांना विनम्र आवाहन...!

दै. समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
६ वा वर्धापन दिन विशेषांक-२०२५

रोखठोक प्रतिक्रिया पाठवण्याबाबत

दैनिक समर्थ राजयोग या शासनमान्य वृत्तपत्राचा शुक्रवार दिनांक 5 सप्टेंबर 2025 रोजी 6 वा वर्धापन दिन होत आहे. या निमित्त प्रकाशित होणाऱ्या विशेष अंकामध्ये आपण या वृत्तपत्राबद्दल आपले आलेले अनुभव, परखड मत व्यक्त करू शकता.
आपणास विनम्र विनंती आहे की, आपण कमी शब्दात आशय पूर्ण प्रतिक्रिया तात्काळ व्हाट्सअप नंबर 98 22 62 85 21 यावर आपल्या पासपोर्ट फोटोसह पाठवावी...ही विनम्र विनंती...

आपलाच
वैंभव जगदेवी विवेक स्वामी
संपादक - मो.9822628521
दै.समर्थ राजयोग
सम्राट चौक, शाहुनगर, बीड
Email : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

सस्नेह निमंत्रण

दै. समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
6 वा वर्धापन दिन..!

शुक्रवार दिनांक 5 सप्टेंबर 2025 रोजी शिक्षक दिनी दैनिक समर्थ राजयोग या वृत्तपत्राचा 6 वा वर्धापन दिन आहे.
या वर्धापन दिन सोहळ्यासाठी आपण खास निमंत्रित आहात.
शुक्रवार, दिनांक 5 सप्टेंबर 2025
वेळ - सकाळी 11 ते सायंकाळी 6 पर्यंत....
स्थळ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड

टीप - स्नेही जणांना विनंती आहे की, कृपया वर्धापन दिनानिमित्त शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ स्वीकारले जाणार नाहीत. या ऐवजी इच्छेनुसार शैक्षणिक साहित्य आणावे. आपले हे शैक्षणिक साहित्य गरजवंत होतकरू विद्यार्थ्यांना दिले जाईल... धन्यवाद...

आपलाच
वैंभव जगदेवी विवेक स्वामी
संपादक - मो.9822628521

# संपादकीय

## स्वदेशी वस्तूंचा आग्रह

महात्मा गांधींनी देशवासीयांना स्वदेशी वस्तू वापरण्याचा आणि खेड्याकडे चलण्याचे आवाहन केले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांचीच री ओढली आहे. अमेरिकेसोबत सुरू असलेल्या टॅरिफ वादाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदींनी देशवासीयांना आपले आर्थिक हित जोपासण्याचे आवाहन केले आहे. आपले शेतकरी, लघु उद्योजक, तरुणांचा रोजगार आणि या सर्वांचे हित सरकारसाठी सर्वोच्च स्थानी आहे. त्यामुळे नागरिकांनी भारतीयांच्या काबाडकष्टातून तयार झालेल्या वस्तूच खरेदी कराव्यात असे आवाहन पंतप्रधानांनी केले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकतेच भारत आणि रशियाची अर्थव्यवस्था 'मृत' असल्याचे म्हटले होते. भारत रशियाकडून तेल खरेदी करीत असल्याबद्दल ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के कर आणि दंडाची घोषणा केली आहे.

त्यानंतर पंतप्रधान मोदींनी वाराणसी येथे बोलताना देशवासीयांनी नवीन वस्तू घेताना स्वदेशी मालाला पसंती द्यावी असे आवाहन केले. डोनाल्ड ट्रम्प यांना अप्रत्यक्ष प्रत्युत्तर देताना पंतप्रधान म्हणाले, भारत जगातील तिसरी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या तयारीत आहे. भारताने आपल्या आर्थिक हितसंबंधांबाबत जागरूक राहायला हवे, तसेच स्वदेशी उत्पादनांवर भर देत पुढे गेले पाहिजे. ज्या वस्तू तयार करण्यासाठी आपल्या देशवासीयांनी घाम गाळला आहे, अशा वस्तू स्वदेशी आहेत. आपण 'मेक इन इंडिया' वस्तूच खरेदी केल्या पाहिजेत. आपले सरकार देशाच्या विकासासाठी जे काही शक्य आहे ते करत आहे. ज्यांना देशाचा विकास करायचा आहे,

भारताला जगातील सर्वांत मोठी तिसरी अर्थव्यवस्था म्हणून पहायचे आहे, त्यांनी आपले मतभेद बाजूला ठेवून स्वदेशी वस्तूंसाठी आग्रही राहिले पाहिजे. यासाठी कोणताही राजकीय पक्ष, राजकीय नेता असो त्यांनी मतभेद बाजूला ठेवून स्वदेशीचा संकल्प केला पाहिजे असेही पंतप्रधान म्हणाले. जागतिक पातळीवर अस्थिरतेचे वातावरण आहे. सारे देश त्यांच्या वैयक्तिक हितसंबंधावर लक्ष देत आहेत. त्यामुळे भारतालाही आपल्या आर्थिक हितसंबंधाबाबत अधिक सतर्क राहावे लागेल. जागतिक पातळीवर अनिश्चितता असताना व्यापा-यांनी केवळ स्थानिक वस्तूंची विक्री करण्याची शपथ घ्यावी. ग्राहकांनी खरेदी करताना ते देशातच उत्पादित झाले आहे काय, याचा जरूर विचार करावा असे सांगत पंतप्रधानांनी स्वदेशी उत्पादनांच्या वापरावर भर दिला. देश स्वतंत्र झाला तेव्हा भारतीयांची 'मेड इन इंग्लंड', 'मेड इन जापान', 'मेड इन यूएसए' वस्तूंना पसंती असायची. कारण या वस्तू टिकाऊ, मजबूत आणि त्यांचा दर्जा उत्तम असायचा. त्यानंतर हळूहळू प्रत्येक क्षेत्रात भारताने प्रगती साधण्यास सुरुवात केली आणि भारतीय वस्तूही जागतिक दर्जाच्या बनू लागल्या हा इतिहास आहे. ट्रम्प यांनी भारतीय अर्थव्यवस्थेला 'मृत अर्थव्यवस्था' असे संबोधले होते. तसेच भारतीय मालावर २५ टक्के टॅरिफ लावल्याची घोषणा करून रशियन युद्धसामग्री व तेल वापरल्यास दंडाची घोषणा केली होती. त्यावर पंतप्रधानांनी पहिल्यांदाच भाष्य केले.

वाराणसी मतदारसंघात पंतप्रधानांनी २ हजार कोटींच्या प्रकल्पांचे भूमिपूजन, उद्घाटन केले. या मतदारसंघातील बनौली गावात बोलताना पंतप्रधान म्हणाले, आम्ही लखपती दीदी मोहीम राबवत आहोत. आमचे लक्ष्य तीन कोटी लखपती दीदी बनवण्याचे आहे. हा आकडा ऐकून सपावाले सायकल घेऊन पळून जातील. आतापर्यंत आम्ही दीड कोटी महिलांना लखपती दीदी बनवले आहे. सरकारने महिलांसाठी मोठे काम केले आहे. अमेरिकेच्या दबावामुळे भारताने रशियाकडून तेलखरेदी बंद केल्याचा दावा केला जात होता परंतु 'एएनआय'च्या वृत्तानुसार भारताने रशियाच्या तेल रिफायनरीकडून खरेदी सुरूच ठेवली आहे. ट्रम्पसाठी हा निर्णय धक्कादायक मानला जात आहे. खरे पाहता जागतिक व्यापाराचा निर्णय हा किंमत, कच्च्या तेलाची गुणवत्ता, साठवण आणि इतर आर्थिक घटकांवर आधारित घेतला जातो. रशिया जगातील दुसरा मोठा कच्च्या तेलाचा उत्पादक देश आहे. रशिया दिवसाला ९.५ मिलियन बॅरल तेलाचे उत्पादन करतो. तसेच तो जगातील दुसरा सर्वाधिक तेल निर्यात करणारा देश आहे.

रोज सुमारे ४.५ मिलियन बॅरल कच्च्या तेलाची निर्यात केली जाते. 'ऑपरेशन सिंदूर' मध्ये भारतीय बनावटीच्या ब्रह्मोस क्षेपणास्त्रांनी पाकिस्तानी हवाई तळावर कोणताही अडथळा न येता अचूक हल्ले केले. डोनाल्ड ट्रम्प यांच्या आयात शुल्क (टॅरिफ) धोरणामुळे जागतिक अर्थव्यवस्था अस्थिर झाली आहे. अनेक देशांवर त्यांनी हे निर्बंध लागू केले आहेत, मात्र असा निर्णय घेऊन त्यांनी स्वत:च्याच पायावर धोंडा मारून घेतला आहे. याचे परिणाम अमेरिकन जनतेला भोगावे लागणार आहेत. टॅरिफ निर्णयामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर कोणताही मोठा परिणाम होणार नाही. पण अमेरिकेची अर्थव्यवस्था मात्र धोक्यात येऊ शकते. एसबीआयच्या एका अहवालानुसार ट्रम्प यांनी लावलेल्या टॅरिफचा फटका भारतापेक्षा अमेरिकेलाच जास्त बसू शकतो. ट्रम्प यांनी 'अमेरिका फर्स्ट' धोरणांतर्गत टॅरिफचा वापर करून अनेक देशांना व्यापारी करार करण्यास भाग पाडले. आतापर्यंत त्यांनी ३३ देशांशी अशा प्रकारे व्यापारी करार केले आहेत पण भारत या सापळ्यात अडकला नाही. भारतासारखी मोठी बाजारपेठ सोडणे अमेरिकेला महागात पडू शकते. भारत जगातील सर्वांत जास्त लोकसंख्या असलेला देश आहे. २०३० पर्यंत त्याची ग्राहक बाजारपेठ ४६ टक्क्यांनी वाढेल असा अंदाज आहे.

# जगन्नाथ सोनवणे व शशिकांत भोकरे यांचे शैक्षणिक कार्य अतिउत्कृष्ट होते

## मा.आ.भीमराव धोंडे, मा. साहेबराव दरेकर,मा.आ.बाळासाहेब आजबे एका व्यासपीठावर..! दोघांनीही चांगली पिढी घडविण्याचे काम केले – विजय गोल्हार,देविदास धस

आष्टी / राजेंद्र लाड

नियत वयोमानानुसार वयाची ५८ वर्ष पुर्ण झाल्यामुळे मांडवा शाळेचे आदर्श मुख्याध्यापक जगन्नाथ सोनवणे व आदर्श सहशिक्षक शशिकांत भोकरे हे दोघेही ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. या निमित्त जगन्नाथ राघोबा सोनवणे (राज्य पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक जि. प. प्रा. शा. मांडवा) व शशिकांत आदिनाथ भोकरे (सहशिक्षक जि. प. प्रा. शा. मांडवा) यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा रविवार दिनांक २४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वा. मोरेश्वर मंगल कार्यालय, आष्टी, जि. बीड येथे भव्य दिव्य स्वरुपात संपन्न झाला.

या सेवापुर्ती गौरव सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी चेअरमन आदिनाथ सानप हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून मा. आ. भीमरावजी धोंडे साहेब, मा. आ. साहेबराव दरेकर नाना, मा. आ. बाळासाहेब आजबे काका, समाजसेवक तथा भाजपा महाराष्ट्र परिषद सदस्य विजयकुमार गोल्हार, मा. जि. प. सदस्य देविदास आबा धस, ह. भ. प. दिनकर महाराज तांदळे, किशोर नाना हंबर्डे, जि. प. बीड च्या मा. अध्यक्षा श्रीम. सविताताई गोल्हार, मा. पं. समिती सदस्य रावसाहेब आबा लोखंडे हे उपस्थिती होते. तसेच इंजि. वाय. आर. गर्जे भाऊ, विधिज्ञ रमाकांत भोकरे, ह. भ. प. कोल्हे महाराज, डॉ. मधूकर हंबर्डे, नामदेव भाऊ राऊत, मा. शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, मा. तहसिलदार शहादेव गिते, सुखलाल मुथ्था शेठ, डॉ. सोपानराव निंबोरे, संतोष शेठ मेहेर, अमोल शेठ भंडारी, गटशिक्षणाधिकारी पाटोदा धनंजय बोंदार्डे, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मनोरंजन धस, मा. शि. वि. अधिकारी अर्जुन गुंड, सुरेश पवार, केंद्रप्रमुख त्रिंबक दिंडे, शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष मारुती पठाडे, उपाध्यक्ष अशोक लटपटे, सचिव महेशकुमार शिंदे, पत्रकार अंकुश तळेकर, शरद रेडेकर यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.

सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज व सरस्वती माता यांच्या प्रतिमेचे अध्यक्ष व प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते पूजन करण्यात आले. अध्यक्ष निवड शशिकांत खंडागळे यांनी केली तर अनुमोदन शिवाजी पांढरे यांनी दिले. तद्नंतर सोहळ्याचे प्रास्तविक मुख्याध्यापक रघुनाथ



खंडागळे यांनी सविस्तर करुन दोनही सत्कार मूर्तींचा आजवरचा लेखाजोखा मांडला. नंतर अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचा भगवतगीता व पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला. तसेच अध्यक्ष व प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते आदर्श मुख्याध्यापक जगन्नाथ सोनवणे व आदर्श शिक्षक शशिकांत भोकरे यांचा सपत्नीक उभा पोषाख देवून सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी स्वामी विवेकानंद पतसंस्थेच्या वतीने सन्मानपत्र देवून दोघांचाही सन्मान करण्यात आला. यानंतर गहिनीनाथ सेवा मंडळातर्फे मुख्याध्यापक श्यामसुंदर शेकडे, बाळासाहेब गर्जे, बाळासाहेब लटपटे यांनी उभा पोषाख देवून सत्कारमूर्तीचा सन्मान केला.

याप्रसंगी अध्यक्षस्थानावरुन बोलतांना आदिनाथ सानप म्हणाले की, आई – वडिलांची सेवा करावी पण सुक्षिशित व्यक्तीच हे करतांना दिसत नाहीत अशी खंत व्यक्त करुन दोनही सत्कारमूर्तींना शुभेच्छा दिल्या. तसेच याप्रसंगी मा. आ. भीमराव धोंडे साहेब म्हणाले की, दोनही सत्कारमूर्तींनी खुप मोठी चांगली शैक्षणिक सेवा आपल्या कार्यक्षेत्रात केलेली आहे. जास्तीत जास्त सेवा मिळणे हे खुप कमी शिक्षकांच्या नशिबी असते. तुमचे नशिब चांगले आहे म्हणूनच तुम्हांला जास्त सेवा करण्याची संधी मिळाली. तसेच तुम्ही दोघांनीही स्वतःच्या मुलांपेक्षा शाळेतील मुलांना जास्तीचे शिकविले आहे असे म्हणत दोघांनाही निरोगी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच याप्रसंगी मा. आ. बाळासाहेब आजबे काका म्हणाले की, सोनवणे सर व भोकरे सर यांनी आजपर्यंत चांगले विद्यार्थी घडविले असून यापुढे दोघांनीही सामाजिक कार्यासाठी पुढे यावे असे सांगत भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी विजयकुमार गोल्हार म्हणाले की, या दोनही सत्कारमूर्तींनी गरिबीची जाण ठेवून शैक्षणिक कार्य केलेले आहे. हे दोघेही आपल्या कर्तुत्वाने मोठे झालेले आहेत असे सांगत भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच ऑनलाईन बदल्या चांगल्या आहेत असे मला निश्चित वाटते असेही शेवटी त्यांनी सांगितले. यावेळी देविदास आबा धस बोलतांना म्हणाले की, या दोघांनीही शाळेतील मुलांना चांगले शिक्षण दिल्यामुळे या दोघांचीही मुले उच्च शिक्षित आहेत. आम्ही जेंव्हा शिक्षण घेत होतो तेंव्हा आम्हांला शिक्षण देणारे शिक्षक कमी शिकलेले होते पण सध्याचे शिक्षक उच्च शिक्षित आहेत. अशा उच्च शिक्षित शिक्षकांनी मुलांना चांगले ज्ञानदान करुन उच्च शिक्षित बनवावे अशी अपेक्षा व्यक्त करुन भविष्यात या दोनही सत्कारमूर्तींनी लांबपर्यंत फिरावे, देवदर्शन करावे असा सल्ला यावेळी त्यांनी दिला.

तसेच याप्रसंगी मा. शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे, चेअरमन मारुती पठाडे, श्रीम. राजश्री संजय गर्जे यांनी आपले अनमोल विचार मांडले. तसेच शशिकांत भोकरे व जगन्नाथ सोनवणे या सत्कारमूर्तींनी आपल्या सेवाकार्यातील अनेक प्रसंग सांगून सेवाकाळात ज्यांनी – ज्यांनी मदत केली त्या सर्वांचे आभार व्यक्त केले.

सदरील सेवापुर्ती सोहळ्यास सोनवणे सर व शशिकांत भोकरे सर यांचे नातेवाईक, मित्र परिवार, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व साहित्य क्षेत्रातील मान्यंवर मंडळी तसेच आजी माजी सरपंच, आजी माजी उपसरपंच, स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे आजी माजी संचालक, आजी माजी केंद्रप्रमुख, आजी माजी मुख्याध्यापक, शिक्षक – शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे बहारदार सुत्रसंचलन आदर्श शिक्षक बाळासाहेब तळेकर यांनी तर आभार शिक्षक पतसंस्थेचे उपाध्यक्ष अशोक लटपटे यांनी मानले. तरी हा सेवापूर्ती गुणगौरव सोहळा यशस्वी होण्यासाठी केंद्रीय मुख्याध्यापक व सर्व घटक शाळा केंद्र बेलगाव, अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती मांडवा यांनी कठोर परिश्रम घेतले. शेवटी सुरुची भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# रोटरी क्लब सदैव सैनिक कुटुंबियांच्या पाठिशी राहणार – कल्याण कुलकर्णी

## गेवराईत माजी सैनिक सन्मानित

गेवराई ।प्रतिनिधी

प्रत्येक भारतीयांना सीमेवर लढणाऱ्या जवानांबाबत सदैव आदर असतो. आपला जीव धोक्यात घालून भारतमातेचे रक्षण करणाऱ्या भारतीय माजी सैनिकांच्या कुटुंबियांची विचारपूस त्यांना धीर देवून त्यांच्या कुटुंबियांच्या सुखदुःखात सहभागी होणे हीच एक मोठी देशसेवा घडेल असे प्रतिपादन रोटरी क्लब ३१३२ चे सहप्रांतपाल कल्याण कुलकर्णी यांनी केले.

भारतीय सीमेवर देश रक्षणासाठी आपले प्राणपणाला लावणाऱ्या सैनिकांच्या प्रती कृतज्ञता म्हणून स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या वतीने सैनिकांचा सन्मान व्हावा म्हणून गाथा शौर्याची – सन्मान सैनिकाचा या अभिनव उपक्रमाचे आयोजन गुरुवार दि .२१ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता पत्रकार भवन गेवराईच्या सभागृहांत करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी डिस्ट्रीक्ट ३१३२ चे सह प्रांतपाल कल्याण कुलकर्णी तर प्रमुख अतिथी म्हणून उत्कृष्ट रोटरी क्लब अध्यक्ष म्हणून सन्मानित रोटरी क्लब मिडटाऊन बीडचे माजी अध्यक्ष इंजि . नितीन गोपन, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे संघटक तानाजी साळुंके, बळीराम राख,जेष्ठ विधिज्ञ सुभाष निकम, रोटरी क्लब ऑफ गेवराईचे अध्यक्ष प्रा.राजेंद्र बरकसे, सचिव प्रविण जैन यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते रोटरी संस्थापक पॉल हॅरिस व भारतमातेच्या प्रतिमेला पुष्पमाला घालण्यात आली.उपस्थित मान्यवरांचे स्वागत विमला माध्य विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी देशभक्तिपर गीताने केले. प्रास्ताविकात अध्यक्ष प्रा.राजेंद्र बरकसे यांनी क्लबने सदस्यांच्या सहकार्याने केलेल्या प्रगतीचा व कार्याचा आढावा घेऊन माजी सैनिकांच्या गौरव सोहळ्याच्या आयोजनाचा हेतू स्पष्ट केला . गेवराईच्या रोटरी क्लबची घौडदौड उत्तम सुरू असून अल्पावधित क्लबने जनमानसात चांगली प्रतिमा निर्माण केली आहे . समाजातील दुःखी ,पीडित, वंचित यांचे अश्रु पुसण्याचे समाजसेवी कार्य क्लबच्या सदस्यांनी करावे




. माजी सैनिक यांना सोबत घेऊन रोटरीने कार्य करावे . स्वातंत्र्यसैनिक किंवा माजी सैनिक यांची, त्यांच्या पश्चात कुटुंबियांची काळजी रोटरी क्लबने घ्यावी . पूरग्रस्त, आपदग्रस्त, आर्थिक अडचणीत सापडलेल्या लोकांची केवळ आर्थिक नव्हे तर मानसिक शक्ती – धीर देण्याचे, त्यांच्या पाठिशी उभी करावी ,असे सांगून रोटरीचे जागतिक, राष्ट्रीय, राज्य स्तरावर अलौकिक कार्य असल्याचे तसेच रोटरीने निर्माण केलेल्या सुविधांचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे इंजि . नितीन गोपन यांनी सांगितले . या कार्यक्रमात भारतीय सैन्यांनी सेवेत असताना केलेल्या धाडसी शौर्याचे अनुभव कथन, मार्गदर्शन आणि प्रेरणा याचा त्रिवेणी संगम साधला गेला .याच कार्यक्रमात गेवराई शहर व परिसरातील माजी भारतीय सैनिकांना पुष्पगुच्छ व शहीद कॅप्टन कृष्णकांत हायवे पेट्रोल सर्व्हिसेसच्या वतीने गौरवचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले . १५ ऑगस्ट २०२५ रोजी भारतीय स्वातंत्र्याचा ७९ व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून सेवानिवृत्त ,माजी सैनिक यांनी आपलं तरुणपण भारतीय सेनेत भारतीयांची सेवा करण्यासाठी व्यतित केलेलं आहे . या कार्याची जाणीव ठेवून सामाजिक बांधिलकी म्हणून गेवराईमध्ये नव्यानेच सुरू झालेल्या रोटरी क्लब ऑफ गेवराई या क्लबच्या वतीने या प्रकारच्या अभिनव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मंचावरील मान्यवरांचा परिचय प्रा . रामप्रभू मुंढे यांनी करून दिला . यावेळी माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष बळीराम डोंगरे, तानाजी सोळुंके, बळीराम राख यांनी आपली मनोगते व्यक्त केली . कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रोजेक्ट चेअरमन शरद खरात , टीआरएफ चेअरमन डॉ . विजय सिकची , कोषाध्यक्ष सुरेश बरगे , मेंबरशिप डेव्हलपमेंट चेअरमन श्यामकाका येवले, उत्तमराव सोलाने, व्होकेशनल सर्व्हिस डायरेक्टर राजेंद्र डेंगे, नितीन सुरवसे, रामदास शिंदे, लर्निंग फॅसिलिटेटर डायरेक्टर प्रशांत घोटणकर, मनोज वाधवाणी ,जयराज कौरानी आदींनी परिश्रम घेतले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्लब डमिनिस्ट्रेटर गणेश कुलकर्णी यांनी तर आभार पब्लिक इमेजचे डायरेक्टर सुरेंद्र रूकर यांनी मानले . कार्यक्रमास शहरातील प्रतिष्ठित पत्रकार तथा गायक प्रा . सुनिल मुंढे, मुख्याध्यापक कैलास जोगदंड, न प अधिकारी राघव वाहुळे ,श्रीमती नागरे, कॅप्टन एस पी सूर्यवंशी, प्रभकर घोडके, सखाराम कानगुडे ,विश्वास चपळगावकर, राजहंस , शासकीय आयटीआय प्रशिक्षक नाना शिंदे

पान १ वरून...

**राज्यात २६ लाख....**

केला आहे, याबाबत विचारले असता यावर मुख्यमंत्री म्हणाले, गालिब म्हणतो, दिल बहलाने को गालिब खयाल अच्छा है'. ते स्वत:ला आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना समाधान देण्याचा प्रयत्न करत आहेत की ते जिंकत होते आणि त्यांचा पराभव एका कटामुळे झाला. पण जोपर्यंत ते स्वत:च्या पराभवाचे आत्मपरीक्षण करणार नाहीत, तोपर्यंत ते कधीच जिंकू शकणार नाहीत असेही ते म्हणाले.

राजकारण भेटींवरून ठरत नाही

राज ठाकरे आणि फडणवीस यांच्यात सतत होणा-या भेटींमुळे जनतेत निर्माण झालेल्या राजकीय संभ्रमाबाबत विचारले असता, फडणवीस म्हणाले जनतेला गोंधळून जायची काहीच गरज नाही. आमची 'महायुती' अखंड आहे. आम्ही निवडणूक 'महायुती'च्या अंतर्गतच लढवू. कोण कोणाला भेटते यावरून युती ठरत नाही. राजकारण भेटींवरून ठरत नाही. महायुती निवडणूक लढवेल आणि महायुतीच विजयी होईल.

**गोंदीतील वाळू तस्कर ...**

गोंदी पोलीस ठाणे फुलचंद हजारे, अशोक नागरगोजे, दीपक भोजने अशा गुन्हेगारांची यादी तयार पुढील कारवाई लवकरच जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये अशा प्रकारचे पुनरावृत्ती करणारे गुन्हेगार ओळखले जात असून, गुन्ह्यांनुसार यादी तयार करण्यात आली आहे. लवकरच अशांवरही चझऊ-सारखी प्रभावी कारवाई केली जाणार असल्याचे वरिष्ठ पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**७ सप्टेंबर रोजी बीडमध्ये ....**

पान १ वरून...

केला आहे. या नागरी सत्कार सोहळ्यामध्ये लातूरचे प्रसिद्ध नेत्रतज्ञ ते थेट लातूर लोकसभेचे लोकप्रिय खासदार असा वैद्यकीय ते राजकीय प्रवास यशस्वीपणे पार करणारे लातूरचे खासदार डॉ. शिवाजी बंडप्पा काळगे साहेब यांना संत शिरोमणी मन्मथ स्वामी राज्यस्तरीय आदर्श संसदभूषण पुरस्कार – २०२५ आणि उमरगा विधानसभा मतदार संघातील उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे आमदार प्रवीण स्वामी यांनी एक शिक्षक ते थेट आमदार असा राजकीय प्रवास यशस्वीपणे केला आहे. यांना श्रीसंत शिरोमणी मन्मथ स्वामी राज्यस्तरीय आदर्श विधानसभा भूषण पुरस्कार २०२५ या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. विशेष बाब म्हणजे या दोन्ही सत्कारमूर्ती रत्नांना कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नव्हती. तरीदेखील त्यांनी राजकारणात पहिल्याच निवडणुकीमध्ये मिळवलेली खासदारकी आणि आमदारकी वीरशैव स्वामी जंगम समाजासाठी अभिमानाची बाब आहे. याकरताच या दोन रत्नांचा बीड येथे वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने जाहीर नागरी सत्कार रविवार दिनांक ७ सप्टेंबर रोजी करण्यात येणार आहे. या सत्कार सोहळ्यानिमित्त बीड जिल्ह्यातील पाच शिवाचार्य महाराजांचा देखील श्री संत शिरोमणी मन्मथ स्वामी राज्यस्तरीय आदर्श गुरुवर्य शिवाचार्य पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये ष भ्र १०८ श्री गुरु डॉ. शंभुलिंग शिवाचार्य अंबाजोगाईकर महाराज,मानूर मठाचे मठाधिपती ष भ्र १०८ श्री गुरु विरूपाक्ष शिवाचार्य मानूरकर महाराज,ष भ्र १०८ श्री गुरु डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महास्वामीजी मन्मथधाम,ष भ्र १०८ श्री गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य माजलगावकर महाराज,ष भ्र १०८ श्री गुरु चन्नबसव शिवाचार्य बर्दापूरकर महाराज यांचा यथोचित

पान १ वरून...

सत्कार करण्यात येणार आहे. या गुरुवर्यांच्या शुभाशीर्वादामध्ये सत्कारमूर्तींचा सन्मान करण्यात येणार आहे. या सत्कार सोहळ्याला बीड जिल्ह्यातील स्वामी जंगम समाजाने उत्स्फूर्तपणे उपस्थित राहावे असे आवाहन जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजक वैभव जगदेवी विवेक स्वामी यांनी केले आहे.

स्वामी समाजातील प्रशासकीय अधिकाऱ्यांचा सन्मान...

स्वामी जंगम समाजातील जे क्लास वन आणि क्लास टू वर्ग चे अधिकारी आहेत. अशा सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांचा बीड येथे ७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या नागरी सत्कार सोहळ्यात सन्मान करण्यात येणार आहे. हा सत्कार स्वीकारण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी उस्फूर्तपणे उपस्थित राहावे.हा सत्कार स्वीकारण्यासाठी येणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी कृपया ९८ २२ ६२ ८५ २१ या व्हाट्सअप नंबर वर आपला पासपोर्ट फोटो आणि माहिती पाठवून नोंद करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

**घारेगावच्या सुखना.....**

मिळुन आले यावरुन पाच आरोपी व नमुद ट्रॅक्टर हे पोलिस ठाणे पाचोड येथे आणुन जप्ती पंचनामा करण्यात आला,सदर जप्ती पंचनामा कार्यवाही मध्ये ५ विना क्रमांकाचे ट्रॅक्टर त्याचे सोबत वाळूने भरलेल्या ट्रॉली सह जप्त केले असुन एकुण३०'२२५००/ (तीस लाख बावीस हजार पाचशे रुपये चा मुद्देमाल जप्ती पंचनामा कारवाई मध्ये पंचा समक्ष् जप्त करण्यात आला व सदर प्रकरणामध्ये पोलिस ठाणे पाचोड येथे अप.क्र. ३२२/२०२५ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता २०२३ पो.उप.नि नाईकवाडे हे करत आहे.

# भगवान बिरसा मुंडा यांनी संघर्षातून आदिवासी समाजाचे आत्मभान जागवले - आमदार भीमराव केराम

## ‘जनजाती गौरव’ विशेष कार्यक्रमांतर्गत ‘आदिवासी समाजाचे योगदान व भूमिका’ या विषयावर आधारित दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे शानदार उद्घाटन संपन्न






बीड ।प्रतिनिधी

भगवान बिरसा मुंडा यांनी संघर्षातून आदिवासी समाजाचे आत्मभान जागवले. आज या चर्चासत्रातून आदिवासी समुदायाच्या पुनरुज्जीवनासाठी नवीन वाटा खुल्या होतील. आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे उत्तम नियोजन नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यामुळे झाले. यानिमित्ताने बीडमध्ये देशभरातील अभ्यासक एकत्र आले आहेत. यातून आदिवासींच्या योजनांची आखणी होईल व त्याचा मोठा लाभ भविष्यात मिळेल, असा विश्वास आमदार भीमराव केराम यांनी व्यक्त केला.

भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त ‘जनजाती गौरव’ विशेष कार्यक्रमांतर्गत ‘भारतीय इतिहासाच्या जडणघडणीत जनजाती (आदिवासी) समाजाचे योगदान व भूमिका’ या विषयावर आधारित दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन बीडमध्ये यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात रविवारी (दि.२४) सकाळी ११ वाजता उत्साहात पार पडले. उद्घाटक म्हणून आमदार भीमराव केराम हे बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.विजय फुलारी हे होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, साऊथ आफ्रिका विद्यापीठाचे मानववंशशास्त्र व पुरातत्वशास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ.झोडवा रादेबे, कला व संगीत विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ.बोंगानी मखोंझा, पद्मश्री चैत्राम पवार, आदिवासी विकास मंत्र्यांचे ओएसडी धनराज पाटील, जि.प.चे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, सेवानिवृत्त आयुक्त संभाजी सरकुंडे, सेवानिवृत्त पोलिस अधीक्षक मेश्राम, डॉ.दिपाताई क्षीरसागर, नवगण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष किशोर काळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना आ.भीमराव केराम म्हणाले, आदिवासी संस्कृतीचे संवर्धन व संरक्षण होणे ही काळाची गरज आहे. नव्या तंत्रज्ञानाची वेगवान प्रगती, आधुनिकीकरणाच्या वाढत्या प्रभावामुळे आदिवासी संस्कृती दिवसेंदिवस लोप पावत चालली आहे. सरकार आदिवासींच्या विकासासाठी कटिबद्ध असून, लोप पावत चाललेल्या संस्कृतीवर विचारमंथन होणे ही आजची खरी गरज आहे. आदिवासी समाज मुख्य प्रवाहात आणण्यासाठी समाजातील अनेक घटक प्रयत्नशील आहेत. आदिवासींचे जननायक बिरसा मुंडा यांचे विचार अनुकरणीय असून या चर्चासत्रात त्यावर उहापोह व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी प्रा.डॉ.विजय फुलारी, डॉ.योगेश क्षीरसागर, विवेक जॉन्सन, धनराज पाटील आदींनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा.हमराज उईके यांनी केले. सूत्रसंचलन पत्रकार मयुरा सावी यांनी केले. आभार डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी मानले. यावेळी शिक्षण क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, कार्यक्रमाचे आयोजन नवगण शिक्षण संस्था संचलित पाटोदा येथील वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्ली आणि आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. उद्घाटन सत्रानंतर दिवसभर यशवंतराव चव्हाण नाट्यगृहासह के.एस.के. महाविद्यालयात विविध चर्चासत्र पार पडले.

### आदिवासी गीत, नृत्य ठरले मुख्य आकर्षण

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या स्वागतासाठी सादर केलेले स्वागतगीत, आदिवासी संस्कृतीनुसार मोरपिसाची जिरेटोपी परिधान करून केलेले मान्यवरांचे स्वागत व आदिवासी बांधवांनी सादर केलेले पारंपरिक नृत्य हे उद्घाटन सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरले. स्वागतावेळी आदिवासी गाण्यांवर परदेशी पाहुणेही चांगलेच थिरकले. त्यानंतर सभागृहात के.एस.के. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून स्वागत गीत सादर करण्यात आले. कार्यक्रमात आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

### परदेशी पाहुण्यांकडून शोधनिबंधाचे वाचन

दक्षिण आफ्रिका विद्यापीठाच्या मानववंशशास्त्र व पुरातत्त्वशास्त्र विभागातील प्रा. डॉ. झोडवा रादेबे यांनी आपल्या शोधनिबंधाचे वाचन केले. यावेळी त्यांनी भारतातील आदिवासी समुदाय व संस्कृतीची वैशिष्ट्ये स्पष्ट करून, जागतिक परिप्रेक्ष्यात भारतीय जनजातींचे वेगळेपण अधोरेखित केले.



# भारतीय क्रांतीकारक हुतात्मा शिवराम राजगुरु यांची ११७ वी जयंती साजरी ....!

पैठण ।प्रतिनिधी

महेंद्र सिमेंट ण्ड स्टील तथा डॉ बाबासाहेब आंबेडकर सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष.श्री महेंद्र राजगुरू यांच्या चांगतपुरी येथील कार्यालयात शहीद राजगुरु यांची ११७ वी जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली . फटाक्यांच्या आतशबाजीत, देशभक्तीपर गीतांच्या आवाजात,व असंख्य देशप्रेमी नागरीकांच्या उपस्थितीत.शहीद राजगुरू,भगतसिंग, सुखदेव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन करून संपन्न झाली.



महेंद्र राजगुरू यांनी शहीद राजगुरु यांच्या विषयी मोलाची माहीती सांगीतली.यावेळी आयोजक महेंद्र राजगुरु,बाळासाहेब तट्टू, बाळासाहेब झारगड,शौकत पठाण,सूर्यकर्ण खेडकर,साईनाथ होरकटे,जगन्नाथ माने,खंडू नलभे यांच्या सह गोकुळ होरकटे,वैजनाथ बांगर,राजेंद्र खेडकर,प्रकाश राजगुरू,श्रीमंत खाडे,नागेश चोरमले,शुभम होरकटे,दिपक नवगिरे,रामनाथ कानडे,गणेश चोरमले,बाळू शिंदे,प्रणय चोरमले,नवनाथ किसे,प्रतीक नवगिरे,भाऊसाहेब खाडे,दत्ता चोरमले,रमेश नलभे,बाळासाहेब चोरमले,नवनाथ घायतलक,अरिहंत राजगुरु,अमोल धायगुडे,प्रणय राजगुरु,कृष्णा राजगुरू,बालाजी माने,नामदेव राजगुरू,कुमार ठाकूर आदींनी प्रतिमेस पुष्पहार व पुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली.यावेळी मान्यवरांनी भगतसिंग,सुखदेव,राजगुरु यांच्या कार्याबद्दल आपले विचार मांडले. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चांगतपुरी गावातील अनेक मान्यवर व विविध पक्ष व संघटनेतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शौकत पठाण यांनी केले तर बाळासाहेब झारगड व महेंद्र राजगुरू यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# भंगार बेवारीस गाडी उचलून घेऊन जाणार का !

मुंबई । प्रविणभाऊ पवार

खार पुर्व जवाहर नगर, साईबाबा रोड, खार (पुर्व) मुंबई येथील राजलक्ष्मी बिल्डिंग समोर गेली अनेक वर्षांपासून गाडी क्रमांक चक०१ -द २२८४ टाटा नॅनो ही लाल रंगाची गाडी मोडकळीस व बेवारस अवस्थेत रस्त्याच्या कडेला पडून आहे. या गाडीच्या सर्व काचा फुटलेल्या आहेत. त्याचबरोबर गाडीचे सर्व पत्र्यानां गंज लागून गाडी मोडकळीस अवस्थेत आहे. या बेवारस गाडीच्या आतमध्ये कोणीही वस्तू ठेवू शकतो. अनेक लोक यांचा गैरवापर करत असतात. यांच्या आत कचरा टाकलेला आहे. या बेवारस गाडीमुळे भविष्यात येथे मोठा धोका व अनर्थ होऊ शकतो. महानगरपालिकेने रस्त्यावरील बेवारस वाहनांविरोधात मोहीम तक्रार नोंदवण्यासाठी व्हॉट्स अप करा. पश्चिम उपनगरे येथे फोन केला तो स्विच ऑफ दाखवत आहे. येथे फारसा प्रतिसाद मिळालेला नाही. तेव्हा संबंधित एच.पुर्व. महानगरपालिका विभाग व वाहतूक पोलीस इघउ विभागाने ही बेवारस गाडी उचलून घेऊन जाण्याची प्रयत्न करावे. हि जागा पुर्वी प्रमाणे मोकळी करावी.



# आयकॉन पॅराडाईज शाळेमध्ये शाडू माती पासून गणपती बनवण्याची कार्यशाळा संपन्न.....!

**पैठण ।प्रतिनिधी**

**विशाल बहुउद्देशीय प्रतिष्ठान संचलित आयकॉन पॅराडाईज इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज पैठण मध्ये मराठवाडा साहित्य परिषदेचे संचालक, संस्थाध्यक्ष प्रा. संतोष पाटील तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली, दशसूत्री कार्यक्रमांतर्गत, शनिवार दप्तर मुक्त शाळा, कृतीयुक्त प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत, विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळवण्यासाठी, प्राचार्य आर. बी. रामावत यांच्या नेतृत्वाखाली शाडू माती पासून गणपती बनवून प्रदूषण मुक्त गणेश उत्सव साजरा करण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.**



याप्रसंगी कलाशिक्षक राजेश्वर जमादार यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विद्यार्थ्यांनी आनंदाने शाडू माती पासून गणपती बनवण्याच्या कार्यशाळेमध्ये सहभाग घेतला. प्राचार्य आर.बी. रामावत यांनी सांगितले की विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळावा तसेच प्रदूषण मुक्त गणेश उत्सव साजरा करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी व विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा. या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. शाडूच्या मातीचा गणपती हा एक पर्यावरणपूरक पर्याय आहे, जो सहज विरघळतो आणि पर्यावरणाची हानी टाळतो. या मातीच्या मूर्ती नदीच्या गाळापासून बनवलेल्या असतात आणि त्या रसायन मुक्त असल्यामुळे विसर्जनानंतरच्या मातीचा वापर झाडे लावण्यासाठी किंवा बागकामासाठी करता येतो. प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) च्या तुलनेत शाडूची माती अधिक सुरक्षित आणि आरोग्यासाठी चांगली असते. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांमध्ये गणपती बनवताना प्रचंड उत्साह दिसून आला. विद्यार्थ्यांनी शाडू माती पासून अत्यंत सुंदर गणपती मूर्ती बनवल्या व आपल्या घरी शाडूच्या मातीचा गणपती बसून प्रदूषण मुक्त गणेश उत्सव साजरा करण्याचा संकल्प केला. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी डॉ. जालिंदर येवले, सारिका धोकटे, आशा अवधूत, प्रियंका गायकवाड, बी. आर. पठाण, पी. बी. पातकळ, एस.सी. औरंगे, महेंद्र नरके, निलेश देशमुख, ऋषिकेश नवथर, अंबरीश गायकवाड आदींनी प्रयत्न केले.

# खिश्यात हिंदुत्व ठेवलेला मी नाही, यापुढे आयोजकांना ताकद देणार - आ. संजय केणेकर

बीड (प्रतिनिधी)

काल बीड शहरात सकल हिंदु समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महाबली हनुमान महाआरती व सामूहिक हनुमान चालीसा पठण कार्यक्रमास हिंदु विचारांच्या युवकां सोबतच महिलांची लाक्षणिक उपस्थिती होती.



## सामूहिक हनुमान चालीसा पठण कार्यक्रमाने शहर हिंदुमय

याबाबत सविस्तर वृत्त असे की, हिंदु धर्माच्या दृष्टीने पवित्र असलेल्या श्रावण मासातील शेवटचा शनिवार व शनि अमावास्या असा दुर्लभ योग साधून आल्याने शहरातील सकल हिंदु समाजाच्या वतीने किशन आबा चौहान व प्रशांत भैय्या डोरले यांनी आयोजित केलेल्या सामूहिक हनुमान चालीसा पठण कार्यक्रम व महाबली हनुमान महाआरती निमित्त बीड शहरातील असंख्य युवक, व हिंदुप्रेमींच्या समवेत महिलांची ही लाक्षणिक उपस्थिती तसेच परमपूज्य १०८ स्वामी डॉ. विरूपाक्ष शिवाचार्य महाराज, स्वामी योगीराज महाराज, विठ्ठल शास्त्री महाराज, एकनाथ महाराज पुजारी, सौम्य नृसिंह महाराज, सुरवसे महाराज, विनायक महाराज पाटांगणकर यांच्या दैवी आशीर्वादाने आणि लोकनेते आ. संजयजी केणेकर साहेब यांच्या उपस्थितीत हा धार्मिक महोत्सव यशस्वी झाला.

यावेळी सूत्रसंचालन प्रशांत डोरले यांनी तर प्रास्ताविक करताना किशन चौहाण यांनी शहरातील विविध हिंदुत्वाच्या समस्या या जनतेसमोर मांडल्या व त्या सोडवण्यासाठी आगामी काळात सोडण्यासाठी युवकांनी अश्या एकत्रित कार्यक्रमाची गरज असल्याचे सांगितले. तर अध्यक्षीय भाषणात आ. संजय केणेकर साहेब यांनी हिंदुत्वाच्या मुद्द्यावरून चालू असलेल्या विरोधकांच्या खोट्या दाव्यांवर जोरदार टीका करत हिंदुत्वासाठी सर्वतोपरी काम करत राहणार असल्याचे सांगितले तसेच हिंदुत्वाच्या विषयांवर काम करण्यासाठी कायम आयोजकांच्या मागे खंबीर उभे राहणार असल्याचे ही सांगितले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे जिल्हाप्रमुख शंकरजी देशमुख, आनंदजी बार्शीकर, गणेश गुरखुदे, नवनाथ शिराळे, डॉ. मुरली जेसवानी, डॉ. पी.के. कुलकर्णी, अतुलजी घोरड, ड. अमितकुमार मोदी, ड. अभिषेक जोशी, शांतिनाथ डोरले, नगरसेवक राणा चौहाण, सम्राट चौहान, विक्रांत हजारी, अनिल घुमरे, श्रीकांत सानप, भीमराव दले यांची तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नरेंद्र मेहता, मयुर भालेकर, कृष्ना जाधव, कृष्ण पवणे, शुभम सुतार, ऋषी पांडव, आदित्य दोडके, कुणाल चव्हाण, विशाल उदावंत, सागर निंबाळकर, सुशांत सोनटक्के, कमलेश श्रीवास्तव, अक्षय चव्हाण, प्रतीक भोसले, शुभम दोडके, कपूर, चौहान, हेमंत काबरा, राम सदरे, शंकर घेवारे सह अन्य हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# कुंभार पिंपळगाव येथे सोन्या चांदीचे दागिने घरफोडी करणारे २ अट्टल गुन्हेगार जेरबंद

## घरफोडीचे ५ व डिझेल चोरीचे २ गुन्हे उघड– जालना स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



जालना ।प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील घनसांगी पोलीस ठाणे हद्दीतील कुंभार पिंपळगाव येथे दि.२३ जुलै २०२५ रोजी घडलेल्या सोन्या-चांदीच्या दागिन्यांच्या चोरीप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेने उल्लेखनीय यश प्राप्त करत, दोन अट्टल गुन्हेगारांना अटक करून गुन्ह्याचा पर्दाफाश केला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून चोरीचा माल हस्तगत करण्यात आला असून, त्यांनी विविध पोलीस ठाण्यांत दाखल असलेल्या पाच घरफोडी व दोन डिझेल चोरीच्या गुन्ह्यांची कबुली दिली आहे.गुन्ह्याची पार्श्वभूमी कुंभार पिंपळगाव येथील ज्ञानेश्वर मधुकर दहिवाळ यांच्या ज्ञानेश्वरी ज्वेलर्स या सराफ दुकानाचे चॅनेल गेट व शटरचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी दुकानात प्रवेश केला होता. त्यानंतर सुमारे १९,७६,५००/- किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेण्यात आले. याप्रकरणी घनसांगी पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३९२/२०२५, भा.दं.वि. कलम ३३१(४), ३०५(अ) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला होता.

या गुन्ह्यात यापूर्वी शक्ती उर्फ शक्तिमान प्रल्हादसिंग टाक रा. गुरुगोविंदसिंग नगर, जालना यास मुद्देमालासह अटक करण्यात आली असून गुन्ह्यातील दोन आरोपी. आरोपी किशोरसिंग उर्फ टकल्या रामसिंग टाक रा. द्वारकानगर, जालना,गजानन विठ्ठल बरडे रा. रामनगर साखर कारखाना, जालना हा गुन्हा घडल्यापासून फरार होता दि. २३ ऑगस्ट २०२५ रोजी सहा. पोलीस निरीक्षक श्री योगेश उबाळे यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, स्थानिक गुन्हे शाखेच्या दोन पथकांनी राजूर चौफुली परिसरातून दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. किशोरसिंग टाक याच्याकडून ६४,८९२/- किमतीचा चांदीचा ऐवज जप्त करण्यात आला असून सदर दोन्ही आरोपीतांनी अधिक गुन्ह्यांची कबुली या दोघा आरोपींनी पुढील गुन्ह्यांमध्ये सहभागाची कबुली दिली आहे.पो.ठा.अंबड गु.र.नं. ३८१/२०२५, कलम ३०३(२),

पो.ठा. तालुका जालना गु.र.नं. ३८८/२०२५, कलम ३०५, ३३१(४),फत्तेपुर पो.ठा. जि. जळगाव चोपडे नगर येथील घरफोडी वडोद बाजार पो.ठा. छ. संभाजीनगर आळंद येथील मेडिकल फोडल्या बाबत कबुली दिली गजानन बरडे याने डिझेल चोरीच्या गुन्ह्यांतही सहभागाची कबुली दिली आहे पो.ठा.चंदनझिरा गु.र.नं. १३३/२०२५, कलम ३०३(२),पो.ठा. तालुका जालना गु.र.नं. १४२/२०२४, कलम ३०३(२),सदर आरोपींना पुढील चौकशीसाठी घनसांगी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.कारवाईतील अधिकारी आणि पथक यांनी ही यशस्वी कारवाई मा. पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, मा. अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईचे नेतृत्व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि योगेश उबाळे, सपोनि सचिन खामगळ यांनी केले.सदर पथकात खालील अंमलदारांचा समावेश होता.सॅम्युअल कांबळे, लक्ष्मीकांत आडेप, प्रभाकर वाघ, रमेश राठोड, सागर बाविस्कर, भाऊराव गायके, संभाजी तनपुरे, गोपाल गोशिक, सुधीर वाघमारे, प्रशांत लोखंडे, दीपक घुगे, इरशाद पटेल, संदीप चिंचोले, देविदास भोजने, कैलास खार्डे, सतीश श्रीवास, आक्रुर धांडगे, रमेश काळे, धीरज भोसले, कैलास चेके, सौरभ मुळे, भरत कडूळे.यांनी केली आहे.

# विद्यार्थ्याला शिकवणीच्या ठिकाणीच बेदम मारहाण!

## अंकुश सर क्लासेसमध्ये लोखंडी रॉड व दगडाने हल्ला – दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल




जालना ।प्रतिनिधी

शहरात खाजगी शिकवणी संस्थांची संख्या दिवसेंदिवस वाढत असली तरी तिथे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. मंठा चौफुली परिसरातील अंकुश सर क्लासेस येथे शिकवणीसाठी गेलेल्या बारावीतील विद्यार्थ्यावरच दोन सहाध्यायांनी लोखंडी रॉड व दगडाने हल्ला केल्याची धक्कादायक घटना शनिवारी घडली. या घटनेने पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

यश रमेश इंगळे (वय १८, रा. सोनलनगर, जालना) हा बारावीचा विद्यार्थी शनिवारी (दि. २३) रोजी नेहमीप्रमाणे क्लासेसला गेला. दुपारी ब्रेकमध्ये वॉशरूमजवळ असताना अजिंक्य साबळे व अभिजित शिरोळे (दोन्ही रा. जालना) यांनी त्याला अडवून शिवीगाळ केली. त्यानंतर अजिंक्य साबळे याने लोखंडी रॉडने, तर अभिजित शिरोळे याने रुमालात बांधलेला दगड यशच्या डोक्यावर मारला. अचानक झालेल्या या हल्ल्यात यश गंभीर जखमी होऊन रक्तबंबाळ अवस्थेत

खाली कोसळला. तत्काळ त्याच्या मित्रांनी त्याला खाजगी रुग्णालयात दाखल केले असून उपचार सुरू आहेत.या प्रकरणी यश इंगळे याच्या जबाबावरून दोघांविरुद्ध सदरबाजार पोलीस ठाण्यात भादंवि कलम ११८(१), ३५२, ३५१(२), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हेड कॉन्स्टेबल सुभाष पवार करीत आहेत.

### सामान्यांच्या मनातील प्रश्न

अशा प्रकारच्या घटना हे दाखवून देतात की, केवळ अभ्यासाचे क्लासेस नव्हे तर विद्यार्थ्यांची सुरक्षा, वर्तनशिस्त व व्यवस्थापन हेही संस्थांनी गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. पालक आपल्या मुलांना उच्च शिक्षणासाठी पाठवत असताना त्यांचे जीवित धोक्यात येणार असेल, तर या खाजगी शिकवणी केंद्रांवर देखरेख कोण ठेवणार, हा प्रश्न उपस्थित होतो.

# जिवाशी खेळ बंद न केल्यास थेट जिल्हाधिकाऱ्यांचे दालनातच आंदोलन करू– खुर्शीद आलम

## भेसळयुक्त तुप खवा दुध विरोधात धांडे.मामु.तांबे.पाशा.गुरव ची जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार,




बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात येणाऱ्या काळामध्ये हिंदू मुस्लिम व इतर धर्मियांचे पवित्र असणारे सण उत्सव साजरे होणार आहेत त्याच दरम्यान घराघरांमध्ये फराळाचे व गोडधोड खाद्यपदार्थ तूप दही खव्यापासून तयार होतात, सण उत्सवाच्या काळामध्ये भेसळयुक्त तुप खवा दूध पनीर तयार करणारे अन्न भेसळ टोळी सक्रिय होऊन याचा मोठ्या प्रमाणामध्ये गैरफायदा घेण्याची दाट शक्यता असते आणि सध्याही घेत आहेत. वेळोवेळी अन्नभेसळ अधिकारी बीड यांना या व्यक्तींवर कार्यवाही व्हावी असे निवेदन देऊन सुद्धा सदरील अधिकाऱ्याकडून कसल्याच प्रकारची कारवाई केली जात नाही आणि हे भेसळुक्त माफिया याचाच गैरफायदा घेत हजारो किलो भेसळयुक्त तुप लाखो लिटर दूध हजारो किलो खवा व पनीर शहरात विक्री करत असतात यामुळे अनेकांना विषबाधा झालेल्या आहेत तरी सुद्धा अन्नभेसळ अधिकारी यांच्याकडून भेसळ करणाऱ्यांवर कसल्याच प्रकारची कारवाई केली जात नाही, म्हणून आज बीड नगरपरिषदेचे आरोग्य रक्षण समीतीचे मा. सभापती खुर्शीद आलम यांच्या नेतृत्वात तर समाजसेवक ड.महेश धांडे, नगरसेवक शरीफ मामु,शेषेराव तांबे,कंकालेश्वर मंदिराचे संजय महाराज,जिल्हाध्यक्ष शेख पाशा यांच्या प्रमुख उपस्थितीत आज उपजिल्हाधिकारी मार्फत मा. जिल्हाधिकारी जॉन्सन साहेब यांना निवेदन देण्यात आले, निवेदनात म्हटले आहे की बीड शहरातील तसेच जिल्ह्यातील प्रमुख असणाऱ्या स्वीट खाद्य पदार्थ विकणाऱ्या व मोठे कारखाने व असे पदार्थ तैयार करणाऱ्या सर्व ठिकाणी रेड मारून खाद्यपदार्थ चांगल्या दर्जाचे आहेत का तपासावे जेणेकरून भेसळुक्त माफियांना चाप बसेल अन्यथा मोठमोठे आजारांना बळी पडून विषबाधाहून मोठी दुर्घटना होऊ शकते याच अनुषगाने आज बीड शहरातील सर्व सामाजिक संघटनेचे पदाधिकार्यांच्या वतीने मा.उपजिल्हाधिकारी मार्फत जिल्हाधिकारी जॉन्सन साहेब यांना निवेदन देऊन या बाबतीत गांभीर्याने घेण्याचे निवेदन दिले व तात्काळ कारवाई करावी नसता थेट जिल्हाधिकारी साहेबांच्या दालनात आंदोलन करू असा मागणी केली आहे. यावेळी मा. सभापती शहराध्यक्ष खुर्शीद आलम,ड महेश धांडे, नगरसेवक शरीफ मामु, सुनील सुरवसे,संजय गुरव महाराज,सिराज तांबोळी, शेषेराव तांबे,पाशा भाई,सतीश जाधव,मोमीन मुस्तकीम,मैनोदीन भाई, राहुल श्रंगारे, श्री.वडमारे, सह आदी

# राज्यस्तरीय मोफत वधुवर मेळावा अंबाजोगाईत संपन्न




अंबाजोगाई ।प्रतिनिधी

दि २४ ऑगस्ट रविवार रोजी अंबाजोगाई मध्ये संपन्न झाला.अखिल भारतीय पेशवा संघटना भारत यांच्या कडून आयोजित ७ वा वधुवर मेळावा घेण्यात आला. यासाठी अध्यक्षस्थानी राम कुलकर्णी तर प्रमुख अतिथी नंदकिशोर मुंदडा (काकाजी ),डॉ अतुल देशपांडे हे होते यावेळी १८० नोंदी करण्यात आल्या . संस्थापक अध्यक्ष सचिनवाडे पाटील,माडीकर,संतोष जोशी,काजे इत्यादी संभाजीनगर,दिपक कासंडे परभणी, लक्ष्मीकांत दडके,याशिवाय केज,अंबाजोगाई वडवणी,आणि इतर जिल्यातील, तालुक्यातील वधुवर, पालक यांचीही उत्स्फूर्तपणे उपस्थिती होती . कार्य कर्माचे उत्तम सूत्र संचलन सौ अंजली कुलकर्णी यांनी केले तर स्वागत गीत सौ आरती कुलकर्णी सादर केले . मेळावा उत्कृष्ठ होण्यासाठी संजय देशपांडे, अभय जोशी,सुधीर धर्माधिकारी, भास्करराव देशपांडे, विवेक वालेकर ऍड सौ सुनीता देशपांडे,महेश राडकर,उज्ज्वला देशपांडे, सौ रजनी देशपांडे,सौ सविता देशमुख, मिलिंद कुलकर्णी योगेश जोशी,यांनी अतिशय परीश्रम घेतले.नेत्रदिपक असा मेळावा संपन्न झाला.

# सर्वोत्तम गावरस्करांनी शून्यातून विश्व निर्माण केले

## बीडचे जे नाव खराब झाले आहे ते पुन्हा पूर्ववत होण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावा – पद्मश्री डॉ. तात्यासाहेब लहाने



बीड ।प्रतिनिधी

सर्वोत्तम गावरस्कर यांनी कुठलाही आधार नसतांना स्वतःचे साप्ताहिक सुरू केले. त्यानंतर दैनिक करून दोन जिल्ह्यात चालवले ही गोष्ट सोपी नव्हती. मात्र हिमतीने हे दैनिक पुढं चालले. बीडची पत्रकारिता सकारात्मक झाली पाहिजे आणि बीडचे जे नाव खराब झाले आहे ते पुन्हा पूर्ववत होण्यासाठी सर्वांनी सकारात्मक गोष्टी पुढे आणल्या पाहिजेत असे प्रतिपादन पद्मश्री डॉ. तात्यासाहेब लहाने यांनी दैनिक सुराज्यचे संपादक सर्वोत्तम गावरस्कर यांच्या नागरी सत्कार प्रसंगी बोलताना केले. यावेळी त्यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनाचे अनेक किस्से सांगून श्रोत्यांना खळखळून हसवले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रदीप दुबे तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस. एम. देशमुख ,ज्येष्ठ पत्रकार अशोकराव देशमुख उपस्थित होते. पद्मश्री डॉ. तात्यासाहेब लहाने आणि संपादक सर्वोत्तम गावस्कर हे एकेकाळचे रूममेट होते. त्यांना कधी वाटले नव्हते की सर्वोत्तम गावरस्कर संपादक होतील मात्र ते यशस्वी झाले याचा आनंद आहे आणि मित्र म्हणून या कार्यक्रमाला येणे मला क्रमप्राप्त होते असे यावेळी त्यांनी सांगितले. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस.एम. देशमुख, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रदीप दुबे, संपादक दिलीप खिस्ती,ज्येष्ठ पत्रकार प्रमोद कुलकर्णी,जेष्ठ पत्रकार महेश वाघमारे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रजापत्रचे संपादक संजय मालानी यांनी केले. तर आभार प्रदर्शन परीषदेचे विभागीय समन्वयक तथा दैनिक. लोकतंत्रचे कार्यकारी संपादक सुभाष चौरे यांनी केले. यावेळी जिल्हाभरातून मराठी पत्रकार परिषदेचे पदाधिकारी, सदस्य माजी आमदार उषाताई दराडे, ज्येष्ठ नेत्या प्रा. सुशीलाताई मोराळे, संपादक संतोष मानूरकर, पत्रकार संघाचे वसंत मुंडे, संपादक राजेंद्र आगवान, संपादक सुनील क्षीरसागर, संपादक रामभाऊ जोशी, संपादक वैभव स्वामी,संपादक अभिमन्यू घरत जेष्ठ पत्रकार ,सर्वोत्तम गावरस्कर यांचे कुटुंबीय तसेच संपादक सर्वोत्तम गावरस्कर यांच्यावर प्रेम करणारे जिल्ह्यातील अनेक मंडळी, शहरातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.




हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स, मोंढा रोड,बीड जि.बीड -४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : घर नं.१०२, छत्रपती कॉलनी, क्रांती नगर, तहसीलच्या मागे, बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत).

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT INDRADHANUSHYA PRINTERS & PUBLISHERS, MONDHA ROAD, BEED, DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT H.No.102, CHATRAPATI COLONY, KRANTI NAGAR, TAHASIL BACKSIDE, BEED-431122(MAHARASHTRA) (JURISDICTION AT BEED)

# रोजंदारी मजदूर सेनेच्या दणक्याने सरकारी कामगार अधिकाऱ्याने केली औष्णिक विद्युत केंद्राची तपासणी - भाई गौतम आगळे

परळी ।प्रतिनिधी

परळी औष्णिक विद्युत केंद्रात बीड येथील सरकारी कामगार अधिकारी सुधाकर कोनाळे,निरीक्षक काशीद चव्हाण व संबंधित कर्मचाऱ्यांनी रोजंदारी मजदुर सेनेच्या दणक्याने किमान वेतन कायदा १९४८ सह विविध प्रचलित कामगार कायद्याअंतर्गत नुकतीच तपासणी करण्यात आली असल्याची माहिती, कामगार नेते तथा संघटनेचे केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांनी दिली.

औष्णिक विद्युत केंद्राच्या आस्थापनाचे किमान वेतन कायदा १९४८ सह प्रचलित विविध कामगार अधिनियमांतर्गत तपासणी करून दोषी अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी. अन्यथा दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोर संतप्त कंत्राटी कामगार प्रतिनिधी सामुहिक आत्मदहन करतील, असा इशारा एका निवेदनाद्वारे देण्यात आला होता. त्याची गंभीर दखल कामगार आयुक्त कामगार भवन बांद्रा (पूर्व) मुंबई, कामगार उप आयुक्त, छत्रपती संभाजी नगर, यांनी घेऊन निवेदनाच्या अनुषंगाने सरकारी कामगार अधिकारी बीड यांना निरीक्षण करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार मुख्य अभियंता औष्णिक विद्युत केंद्राच्या सर्व विभागातील कार्यकारी अभियंता यांच्या अधिनस्त कंत्राटदार हे कार्यरत कंत्राटी कामगारांचा अर्धा व अर्ध्यापेक्षा जास्त पगार संबंधित अधिकारी व



कंत्राटदार / मक्तेदार मागील अंदाजे २५ ते ३० वर्षापासून चोरी करून शासनाची व कंत्राटी कामगारांची फसवणूक करून लाखो कोटी रुपयांची सरकारची तिजोरी बेधडक लुटून/ भ्रष्टाचार करून कंत्राटी कामगारांचे शोषण करत आहेत. त्या अनुषंगाने सरकारी कामगार अधिकारी बीड सुधिर कोनाळे निरीक्षक काशीद चव्हाण यांनी तब्बल अंदाजे २५ ते ३० वर्षापासून पहिल्यादां नुकतीच तपासणी केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाने दर सहा महिन्याला निरीक्षण करणे गरजेचे असताना सुद्धा आजतागायत तपासणी करण्यात आली नव्हती हे विशेष. रोजंदारी मजदुर सेनेच्या दणक्याने सदरील तपासनी करण्यात आली. महाराष्ट्रातील वीज केंद्र, कोराडी, खापरखेडा, चंद्रपूर, भुसावळ, नाशिक इत्यादी सह सर्व ठिकाणी किमान वेतन कायदा १९४८ सह विशेष भत्ता, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, बोनस, घरभाडे भत्ता, रजेचे रोखीकरण, नुकसान भरपाई भत्ता, (उपदान ५% ) गणवेश धुलाई भत्ता, सुरक्षितता साधने, सायकल आणि वाहन भत्ता, शिक्षण भत्ता, जोखीम भत्ता, पाळी भत्ता, साईड भत्ता, पूरक भत्ता( मूळ वेतनावर ) कामगार सुरक्षितता विमा योजना इत्यादी कामगार कायद्याप्रमाणे जी कायदेशीर भत्ते / वार्षिक प्रतिपूर्ती देय आहे त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाते. तशी वेतन चिठ्ठी फक्त परळी औष्णिक विद्युत केंद्र सोडून सर्व विज केंद्रात दिली जाते. याविरुद्ध कंत्राटी कामगारांनी आवाज उठवण्याचा प्रयत्न केला तर त्या कामगारांना अयोग्य व बेकायदेशीर रित्या कामावरून कमी करण्यात येते. त्यामुळे येथील कामगार तोंड दाबून बुक्यांचा मार सहन करतो. रोजंदारी मजदूर सेना कंत्राटी कामगारांच्या शोषणाचे निर्मूलन करून विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील स्त्री पुरुष कष्टकरी कामगारांचे शोषण होऊ नये म्हणून केलेल्या विविध कामगार कायद्यांचे भारताच्या संविधानाचे आदर सन्मान हा झालाच पाहिजे. याकरिता सातत्याने लढा देत आहे. त्याचा फायदा राज्यातील औष्णिक विद्युत केंद्र परळी सोडून सगळ्यांना प्राप्त झाला आहे. त्यामुळे औष्णिक विद्युत केंद्र परळी वैजनाथ येथील युनिट ६,७ व ८ या आस्थापनाला सुध्दा मिळावा यासाठी संतप्त कंत्राटी कामगारांनी टोकाची भूमिका घेऊन १५ ऑगस्ट २०२५ रोजी सामूहिक आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता. परंतु सरकारी कामगार अधिकारी सुधाकर कोनाळे यांनी संघटनेला लेखी पत्र जा.क्र. सकाअ / बीड / २०२५ /३१३ ला देऊन दिनांक:- १३/०८/ २०२५ रोजी पासून निरीक्षण करण्यात येणार आहे, असे नमूद करून नुकतेच निरीक्षण सुद्धा केल्यामुळे संघटनेचे केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर मराठवाडा अध्यक्ष राजेश कुमार जोगदंड कार्याध्यक्ष सुनील कांबळे यांच्यासह कंत्राटी कामगारांनी सरकारी कामगार अधिकारी कार्यालय बीड यांचे हार्दिक अभिनंदन केल्याचे प्रसिद्धीपत्रकाद्वारे भाई गौतम आगळे सर यांनी कळविले आहे.

# हज़रत शहंशाहवली रहमतुल्लाह अलैह दरगाहचा संदल कार्यक्रमास उपस्थित रहा –शाहबाज कादरी



बीड ।प्रतिनिधी

हज़रत शहंशाहवली रहमतुल्लाह अलैह दरगाहचा संदल कार्यक्रम दिनांक २६ ऑगस्ट २०२५, मंगळवार रोजी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शाहबाज़े लमकानी कादरी फाउंडेशनचे ऑल महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष शेख शाहबाज कादरी यांनी केले आहे.२६ ऑगस्ट २०२५ मंगळवार रोजी संध्याकाळी ५:०० वाजता नमाज–ए–असर नंतर किल्ला मैदान येथून संदल निघेल.रात्री १०:०० वाजता संदल दरगाह येथे पोहोचेल व संदल चढवला जाईल. तर २७ ऑगस्ट २०२५ बुधवार रोजी पहाटे नमाज–ए–फजर नंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येईल. अशी माहिती आयोजकांनी दिली आहे.

# बीड येथील राज्यस्तरीय योग स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

## पुणे जिल्ह्याचा प्रथम क्रमांक ,बीड जिल्ह्याचा दुसरा क्रमांक व तिसऱ्या क्रमांकावर नागपूर जिल्हा

बीड ।प्रतिनिधी

दिनांक २३ ऑगस्ट पासून बीड येथील माँ वैष्णो पॅलेस मध्ये दिनांक २३ ऑगस्ट पासून सुरू असलेल्या ४४ व्या महाराष्ट्र योगा स्पोर्ट्स चॅम्पियनशीप बीड २०२५ या स्पर्धेचे बक्षीस वितरण आज दिनांक २४ ऑगस्ट २०२५ रोजी संपन्न झाले माँ वैष्णो पॅलेस एमआयडीसी पेठ बीड या ठिकाणी संपन्न झालेल्या बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून बीड जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे महामंत्री, या स्पर्धेचे स्वागताध्यक्ष संतोष सोहनी हे व्यासपीठावर अध्यक्षस्थानी उपस्थित होते. या बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर बीडचे माजी उपनगराध्यक्ष अमृत काका सारडा, प्रसिद्ध उद्योगपती दिनेश सेठ मुंदडा, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष बळीराम गवते, नगरसेवक जगदीश गुरखुदे,जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या पोलीस उपनिरीक्षक नीता दामधर , पतंजली योग समिती बीडचे जिल्हा प्रभारी नितीन गोपन, महाराष्ट्र योग असोसिएशनचे चेअरमन तथा भारतीय योग संघाचे प्रशिक्षक व कर्णधार चंद्रकांत पांगारे , महाराष्ट्र योग असोसिएशनच्या अध्यक्ष डॉ. अनिता पाटील, सेक्रेटरी जतीन सोळंके, कोषाध्यक्ष श्रीमती अनिता गायकवाड, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तुकाराम जाधव, महाराष्ट्र राज्य तायक्वांदो असोसिएशनचे उपाध्यक्ष अविनाश बारगजे, बीड डिस्ट्रिक्ट योग असोसिएशनचे अध्यक्ष विनायक वझे, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग बीडचे जिल्हाध्यक्ष विकास गवते , बीड जिल्हा मध्यवर्ती कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस




रामचंद्र ठोसर, व्यासपीठावर उपस्थित होते.४४ व्या राज्यस्तरीय योगा स्पोर्ट चॅम्पियनशिप बीड २०२५ च्या आयोजन समितीच्या वतीने सर्व पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. सत्कार कार्यक्रम नंतर पुणे येथील नारायणी योगा अँड फिटनेस गुरुकुल चे योग खेळाडू व पुणे डिस्ट्रिक्ट योग असोसिएशनचे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू यांनी देशभक्तीपर गीता वर सुंदर असा कलात्मक योग डेमो डान्स या कार्यक्रम प्रसंगी पाहुण्यासमोर सादर केला आणि पाहुण्यांची मन जिंकली सर्व उपस्थित पाहुण्यांनी या खेळाडूंचे कौतुक केले. गेल्या दोन दिवसापासून बीड शहरातील माँ वैष्णो पॅलेस या कार्यालयामध्ये सुरू असलेल्या या योग स्पर्धेतील पहिल्या तीन क्रमांकातील विजेत्या खेळाडूंना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र व मेडल देऊन गौरविण्यात आले. प्रत्येक गटातील पहिल्या तीन क्रमांकाचे खेळाडू मैसूर येथे होणाऱ्या ५० व्या राष्ट्रीय योगा कॉम्पिटिशन साठी महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. मैसूर येथे होणाऱ्या ५० व्या राष्ट्रीय सिनिअर व रांची कर्नाटक येथे होणाऱ्या ५० व्या राष्ट्रीय ज्युनियर योगा कॉम्पिटिशन साठी महाराष्ट्राच्या संघाची घोषणा करण्यात येऊन प्रमुख अतिथींच्या हस्ते त्यांना राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या . बक्षीस वितरणाच्या शेवटी ज्या जिल्ह्यातून जास्तीत जास्त खेळाडूंनी बक्षिसे जिंकले आहेत त्या जिल्ह्यांना त्यांना प्राप्त झालेल्या बक्षीसानुसार गुणांकन देण्यात आले व दिलेल्या गुणांकननुसार महाराष्ट्रातून पहिले पारितोषिक पुणे जिल्ह्यास देण्यात येऊन विजेतेपद घोषित करण्यात आले .द्वितीय क्रमांकाचे उपविजेतेपद यजमान बीड जिल्ह्यास मिळाले. तर तृतीय क्रमांक वर नागपूर जिल्हा आला. तिन्ही जिल्ह्याच्या विजेत्या खेळाडूंना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले*.

*बक्षीस वितरणानंतर स्पर्धेचे स्वागताध्यक्ष श्री संतोष सोहनी यांनी मनोगत व्यक्त केले . स्पर्धेचा स्वागताध्यक्ष या नात्याने महाराष्ट्रातील योग खेळाडूंची सेवा करण्याची संधी मला मिळाली त्याबद्दल परमेश्वराचे व राज्य योग स्पर्धा आयोजन समितीचे आभार व्यक्त केले. बीड जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी श्री शिवकुमार स्वामी यांनी मनोगत व्यक्त करताना इतकी सुंदर स्पर्धा बीड जिल्ह्यात घेण्यात आली त्याबद्दल सर्व खेळाडूंचे व आयोजन समितीचे कौतुक केले व पुढे होणाऱ्या राष्ट्रीय योगा स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघाला प्रशासनाच्या वतीने शुभेच्छा दिल्या. शेवटी बीड डिस्ट्रिक्ट योग असोसिएशनचे अध्यक्ष श्री विनायक वझे यांनी सर्व प्रमुख पाहुण्यांचे व खेळाडूंचे आभार व्यक्त केले.

# सौ.प्रणिताताई देवरे –चिखलीकर यांचा वाढदिवस अत्यंत साधेपणाने व विविध समाजायोगी उपक्रमांनी साजरा

लोहा ।माधव पांचाळ

सामाजिक शैक्षणिक राजकीय व धार्मिक क्षेत्रात सदा अग्रेसर असणाऱ्या जल चळवळीच्या प्रेणेत्या तथा भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा तथा प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या सौ. प्रणिताताई देवरे –चिखलीकर यांचा आज दि. २४ ऑगस्ट रोजी वाढदिवस होता.लोहा –कंधार तालुक्यासह जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्यामुळे व शेतकरी बांधव अडचणीत असल्यामुळे त्यांनी आपला वाढदिवस कार्यकर्त्यांना साजरा न करण्याचे आवाहन केले होते.तेव्हा लोहा शहर व तालुक्यातील कार्यकर्त्यांनी सौ. प्रणिताताई देवरे – चिखलीकर यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत सौ.प्रणिताताई देवरे – चिखलीकर यांचा वाढदिवस अत्यंत



साधेपणाने व विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा केला.तसेच त्यांनी हार तुऱ्या वरील अनावश्यक खर्च टाळून वृक्षारोपण लागवड करण्याच्या आवाहनाला संपूर्ण जिल्ह्यातून मोठया प्रमाणात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.यात लोहा तालुक्यातील कारेगाव येथील पेट्रोल पंपावर सौ.प्रणिताताई देवरे –चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले.तसेच धावरी येथील श्री नंदिकेश्वर विद्यालयात विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले तसेच लोहा शहरातील ओंकारेश्वर महादेव मंदिरात अभिषेक व महाआरती करण्यात आली.यावेळी लोहा शहर व तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आज प्रणिता ताई देवरे यांना भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण ,महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष आमदार चित्राताई वाघ ,जगदीश मुळीक यासह महाराष्ट्रातील तसेच नांदेड जिल्ह्यातील मातब्बर नेत्यांनी शुभेच्छा दिल्या




बीड - आपण स्वत: मागे राहुन कार्यकर्त्यांना पुढे करणारा जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख यांच्या रूपाने भाजपाला लाभला आहे.काल बीडमध्ये आ.संजय केनेकर एका कार्यक्रमाला आले असता कार्यकर्त्यांनी फोटो काढले. त्यावेळी स्वत: मागे राहुन कार्यकर्त्यांना फोटोची संधी दिली. काही लोक कार्यकर्त्यांना मागे करुन स्वत:चे फोटो काढताना आज पर्यंत पाहीले आहे. मान गये देशमुखजी अशी सहज पण महत्वपूर्ण प्रतिक्रिया भाजपा नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी व्यक्त केली आहे.



**माजलगाव ।प्रतिनिधी**

**येथील पत्रकार तथा दस्तऐवज लेखक रविंद्र मधुकर राऊत यांची कन्या धनश्री रविंद्र राऊत रा.कवडगाव(बु)ता.वडवणी ह.मु.अशोकनगर,माजलगाव हि एमबीबीएस डॉक्टर च्या शिक्षणासाठी पात्र झाली आहे. गुणवत्ते नुसार शासकीय कोट्यातून कु.धनश्री राऊत हि बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात गुणवत्तेनुसार प्रवेशपात्र ठरली ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. तसेच तीचे मुळगाव कवडगाव(बु) ता.वडवणी येथील चार विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेत आहेत तर याच गावातील पोलीस खात्यात २०ते २२ युवक कार्यरत आहेत.धनश्री राऊतने अतिशय मेहनतक,जिद्द, चिकाटीने स्वयं अध्ययनातून तिने हे यश मिळविले आहे. तिने दहावीपर्यंत मॉडेल इंग्लिश स्कुल,माजलगाव येथे शिक्षण पूर्ण केले तर बारावीचे शिक्षण लोकनेते सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव येथे पुर्ण केले.हे यश मिळाल्याने तिचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे तर पुढील यशस्वी वाटचाली करीता अभिजित पोटभरे,दीपक टाकणखार, आकाश टाकणखार, गायकवाड यांच्याकडून शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला.**

# रक्षाविसर्जनातून स्मशानभूमीत ५१ वृक्षांचे लागवडीसह संवर्धन!

जालना ।प्रतिनिधी

घरातील गेलेल्या व्यक्तीच्या रक्षा आणि हस्ती, तिर्थक्षेत्र अथवा नदीत विसर्जित न करता तीच रक्षा स्मशानभूमी परिसरात टाकून ५१ वृक्षांची लागवड करत संवर्धन करण्याच्या संकल्प करून बदनापूर तालुक्यातील भराडखेडा येथील घुगे कुटूंबियांनी समाजासमोर आदर्श निर्माण केला. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांचे काका सुप्रसिद्ध व्यापारी तातेराव लिंबाजी पाटील घुगे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. शुक्रवारी त्यांच्या रक्षाविसर्जन कार्यक्रम होता. परिवारातील सदस्यांनी रक्षा नदी, तलाव, धरण यात न टाकता स्मशान भूमी परिसरात ५१ वृक्षांची



## घुगे परिवाराचा पर्यावरण पूरक संदेश

लागवड करून संगोपनाची जबाबदारी ही घुगे व बारगजे परिवाराचे वतीने घेण्यात आली.सर्व झाडांना ट्रीगार्ड लावून ठिबक सिंचन द्वारे पाणी देण्याचे नियोजनही करण्यात आले .वृक्षांच्या माध्यमातून स्व. तातेराव घुगे हे सदैव स्मरणात राहतील, अशी भावना घुगे कुटूंबातील सदस्यांनी व्यक्त केली.

यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, माजी जि. प .सदस्य भानुदासराव घुगे, रामदास घुगे, विलास घुगे ,हरिदास घुगे, गणेश घुगे, रमेश घुगे ,सरपंच भगवान बारगजे, सुभाष बारगजे, बाबासाहेब दराडे ,सखाराम जावळे ,रामेश्वर दराडे, विलास तुपे ,अनिरुद्ध घुगे ,योगेश घुगे, जगदीश नागरे ,प्रकाश जायभाये, संदीप हुसे ,ओमप्रभु नागरे ,सखाराम जावळे ,भानुदास बारगजे, प्रकाश बारगजे ,माधवराव सोरमारे, बाबासाहेब गीते ,बालो दराडे ,संजय घोरपडे ,प्रयागबाई घुगे, जनाबाई घुगे, पार्वतीबाई घुगे ,कडूबाई पालवे, मंदा बारगजे ,सांज घुगे ,रेणुका जायभाये, शारदा जायभाये, सुमनबाई घुगे ,मीना घुगे ,पुष्पा घुगे ,विकास घुगे ,योगेश घुगे यांच्यासह परिवारातील सदस्य, आप्तेष्ट, नातेवाईक ,मित्रमंडळींची उपस्थिती होती.

शिव वाणी SHIV VANI

वेचक वृत्त

सोमवार दि.२५ ऑगस्ट २०२५ MONDAY DT.25 AUGUST 2025 6

# सहा महिन्यात सावळेश्वर मध्ये २०५ स्वराज ट्रॅक्टरची विक्रमी विक्री

## आष्टीकरांचा सावळेश्वर ट्रॅक्टर्स वरचा विश्वास वाढला,ग्राहकांची मोठी पसंती

आष्टी (प्रतिनिधी)

प्रत्येक व्यवसाचा विशिष्ट कालावधीसाठी असतो पण ग्राहकांचा सिजन असला तर खरेदीसाठी जास्त ओढ असते. परंतु याला अपवाद आहे तो म्हणजे रमेश दादा आजबे यांचे सावळेश्वर ट्रॅक्टर्स शोरुम. याला कारण आहे की, सावळेश्वर ट्रॅक्टर्स शोरुम चे सर्वेसर्वा रमेश दादा आजबे यांनी आष्टी तालुक्यातील शेतकरी बांधवांना दिलेली सेवा व शेतकऱ्यांची जिंकलेली मने.

सावळेश्वर ट्रॅक्टर्स या नुतन शोरुमचे उद्घाटन आष्टी शहरात १९ फेब्रुवारी २०२५ रोजी शिवजयंतीच्या शुभमुहूर्तावर धोंडे पेट्रोल पंपाच्या समोर भव्य दिव्य संपन्न झाले होते. उद्घाटना च्या दिवशी १९ ट्रॅक्टर वितरित झाले होते. त्यानंतर अवघ्या ६ महिन्यात २०५ ट्रॅक्टर विक्रीचा विक्रमी पल्ला सावळेश्वर ट्रॅक्टर्स शोरुमने गाठला आहे. हे सर्व फळ त्यांच्या आदर्श सेवेचेच आहे. नुकतीच रमेश दादा आजबे यांनी ६ महिन्यांची ट्रॅक्टर विक्रीची आकडेवारी जाहीर केली आहे. यावरुन भविष्यात त्यांची चांगली तथा अजून विक्रमी विक्री होणार असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. आष्टी शहरात अनेक कंपनीचे ट्रॅक्टर्सचे शोरुम आहेत परंतु सावळेश्वर ट्रॅक्टर्स ने बाजारात आपले स्थान अधिकच मजबूत केलेले आहे. त्यांनी ग्राहकांच्या आर्थिक अडचणी सोडवून, ग्राहकांना मदत करत दिलेली उत्कृष्ट सेवा यामुळेच त्यांनी ग्राहकांची मने जिंकली आहेत. या सर्व गोष्टींमुळेच सावळेश्वर ट्रॅक्टर्स वरचा ग्राहकांचा विश्वास अधिकच वाढला असुन ट्रॅक्टर्स खरेदीसाठी ग्राहक सावळेश्वरच्या स्वराज ट्रॅक्टर ला मोठ्या प्रमाणावर पसंती दर्शवित आहेत. आष्टी तालुक्यातील ग्राहकांनी दिलेले समर्थन व दाखवलेल्या विश्वासासाठी ग्राहकांचे,



शेतकऱ्यांचे तसेच सावळेश्वर ट्रॅक्टर्स टीमचे सावळेश्वर ट्रॅक्टर्स चे सर्वेसर्वा रमेश दादा आजबे यांनी आभार मानले आहेत.

सावळेश्वर उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे पाटील यांनी शेतकऱ्यांच्या जिवनामध्ये परिवर्तन घडवून आणणे आणि त्यांचे जिवन समृद्ध करणे या उद्देशाने प्रेरित होऊन ट्रॅक्टर्स उद्योग जगतात २०१६ पासून पाऊल ठेवलेले आहे. अनेक वेळा त्यांनी शेतकऱ्यांसाठी भव्य सुट देणाऱ्या योजना ठेवल्याने तात्काळ बुकींग करणा-यास सवलत देण्यात आल्याने अवघ्या ६ महिन्यात २०५ स्वराज ट्रॅक्टर्स ची विक्रमी विक्री झालेली आहे. मजबूत, दनगट व कमी खर्चात ज्यादा काम करणाऱ्या स्वराज ट्रॅक्टर्स ने आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांना भुरळ घातली आहे.

हा यशस्वी विक्रमी सेलचा टप्पा ओलांडण्यासाठी संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे यांच्या सह स्टेट हेड गुप्ता साहेब, विभाग मॅनेजर गिरीश जाधव, टेरेटरी मॅनेजर चेतन मुंडे साहेब, ब्रांच मॅनेजर मुळे साहेब, मॅनेजर प्रकाश कदम, मॅनेजर राजू साबळे,अकाउंट प्रांजली उगले, सुजाता सायकड, रेणुका वैद्य, सर्विस मॅनेजर रंजीत मुंडे, आप्पासाहेब गायकवाड, सेल्स टीम मध्ये आकाश शेळके, लखन आजबे, सागर निकरड, जालिंदर भवर, गीते, खंडागळे, गायकवाड, सर्विस टीम मध्ये हनुमान घरगणे, आकाश पवार, कृष्णा भवर, इब्राहिम पठाण, रवींद्र खंडागळे, नामदेव हराळ, ओमकार सोले, स्वप्नील बरकडे, कुमार विश्वकर्मा आदींच्या अथक परिश्रमाने ग्राहकांना जलद सेवा दिल्याने विक्रमी विक्रीचा टप्पा पार केला आहे. ग्राहक राजा, मित्र परिवार, आप्तेष्ट, नातेवाईक, शेतकरी बांधव व आष्टीकरांचे मनापासून आभार.

सावळेश्वर ट्रॅक्टर्स या नावावरती व स्वराज ट्रॅक्टर्स वर आष्टी तालुक्यातील ग्राहकांनी तसेच नागरीकांनी प्रचंड विश्वास दाखवला असून शेतीमध्ये परिवर्तन घडवून आणण्याच्या आणि बळीराजाचे जिवन समृद्ध करण्याच्या उद्देशाने प्रेरित होऊन आम्ही सुरू केलेल्या सावळेश्वर ट्रॅक्टर्स स्वराज ट्रॅक्टर्स चे अधिकृत डिलर ने ६ महिन्यात २०५ ट्रॅक्टर्स विक्रीचा विक्रमी टप्पा पार केला आहे. आपल्या सर्वांच्याच विश्वासास पात्र राहून सेल्स, सर्विस, स्पेअर साठी अधिक लक्ष देऊ, तुमच्या प्रगतीसाठी सावळेश्वर ट्रॅक्टर्स नेहमीच कटीबद्ध आहे. आमच्या ग्राहकांना, शेतकऱ्यांना, आम्हाला दररोज प्रेरणा देणा-या प्रत्येकाला तसेच आमच्या भागीदारांना आणि आमच्या टीमला, आपण सर्वच एकत्र परिवर्तनाच्या प्रवासात असताना मनापासून आभार मानू इच्छितो. रमेश दादा आजबे (प्रो. सावळेश्वर ट्रॅक्टर्स, आष्टी)

# वडवणीत तालुकास्तरीय अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा उत्साहात

## चि.आदित्य मुळे प्रथम तर कु.समृध्दी जाधव व्दितीय

वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी शहरातील डॉ.सोनाजीराव रांजवण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय याठिकाणी काल दि.२१ ऑगस्ट २०२५ गुरुवार रोजी तालुकास्तरीय अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा उत्साहात संपन्न झाला. यामध्ये अनेक शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत वैज्ञानिक विषयाचे सादरीकरण केले. या तालुकास्तरीय स्पर्धेत शेवटी निकालात चि.आदित्य मुळे याने प्रथम तर कु.समृध्दी जाधव हिने व्दितीय क्रमांक पटकावला.

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक कार्यकारणभाव समजून, विश्लेषणात्मक विचारांची जागृती करणे, स्पर्धात्मक वैज्ञानिक दृष्टिकोन वृध्दिंगत करुन भावी वैज्ञानिकांना विचारांच्या आदान-प्रदानाची संधी उपलब्ध करुन देणे, देशात विखुरलेल्या प्रज्ञावाण युवकांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृध्दिंगत करणे ही उद्दिष्टे समोर ठेवून राष्ट्रीय विज्ञान संग्रहालय परिषद कोलकत्ता, प्रादेशिक विद्या प्राधिकरण नागपूर व गटसाधन केंद्र वडवणी यांच्या वतीने वडवणी शहरातील डॉ.सोनाजीराव रांजवण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय याठिकाणी काल दि.२१ ऑगस्ट २०२५ गुरुवार रोजी या तालुकास्तरीय अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान




मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या विज्ञान मेळाव्याचे उदघाटन वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांच्या हस्ते करण्यात आले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक यशवंत भोसले सर हे होते. प्रमुख उपस्थितीत वडवणी केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश करांडे सर व पर्यवेक्षक लांडे सर हे उपस्थित होते. या तालुकास्तरीय अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळाव्याचे उदघाटन मान्यवरांच्या हस्ते फित कापून व देशाचे दिवंगत राष्ट्रपती तथा महान वैज्ञानिक डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमाचे पूजन करुन करण्यात आले. यावर्षी विज्ञान मेळाव्याचा विषय क्वांटम युगाची सुरुवात संभाव्यता व आवाहने असा होता. या विज्ञान मेळाव्यामध्ये वडवणी तालुक्यातून माध्यमिक विभागातून एकूण १० शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. सर्व सहभागी स्पर्धकांची सर्वप्रथम विज्ञान विषयाचे आशय ज्ञानासाठी १० गुणांची लेखी चाचणी घेण्यात आली. सहभागी विद्यार्थ्यांनी सेमिनार पध्दतीने विषयाचे सादरीकरण दृक शैक्षणिक साहित्याचा वापर केला. व त्यानंतर तोंडी प्रश्न त्यांना विचारण्यात आले. या मेळाव्यात डॉ.सोनाजीराव रांजवण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वडवणीचा इयत्ता आठवीचा विद्यार्थी चि.आदित्य अमोल मुळे याने अतिशय अभ्यासपूर्ण माहितीचे सादरीकरण केले व तालुकास्तरावर सर्वप्रथम क्रमांक पटकावला व माध्यमिक विद्यालय पिंपरखेडची विद्यार्थिनी कु.समृध्दी शहादेव जाधव हिने व्दितीय क्रमांक पटकावला व आगामी बीड जिल्हास्तरीय विज्ञान मेळाव्यासाठी त्याची निवड करण्यात आली. या विज्ञान मेळाव्याचे परिक्षक म्हणून प्रा.पाटील सर व प्रा.शेळके मॅडम यांनी काम पाहिले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दोघांचेही पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देवून सन्मान व सत्कार करण्यात आला. या यशाबध्दल वडवणी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे, वडवणीचे केंद्रप्रमुख सुरेश करांडे, मुख्याध्यापक यशवंत भोसले, पर्यवेक्षक लांडे सर यांनी अभिनंदन व कौतुक केले. तसेच सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देवून त्यांचे देखील अभिनंदन करण्यात आले. या तालुकास्तरीय विज्ञान मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी गटसाधन केंद्रातील साधनव्यक्ती श्रीमती.मैमुना मॅडम तालुका समन्वयक, शेख माजेद सर

# फार्मसी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा वर्धापन दिन साजरा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित बी. फार्मसी महाविद्यालय, अंबाजोगाई येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा वर्धापन दिन अभिमानाने, प्रेरणादायी वातावरणात आणि विद्यानिष्ठ भावनेने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा प्राचार्य डॉ. संतोष तरके यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठाच्या ध्वजवंदनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विद्यापीठ गीत गायले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष तरके यांनी उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी विद्यापीठाच्या स्थापनेचा ऐतिहासिक मागोवा घेतला आणि या संस्थेने मराठवाड्यात घडवलेल्या सामाजिक परिवर्तनावर प्रकाश टाकला. त्यांनी विद्यापीठाच्या नामांतर लढ्याची आठवण करून देत विद्यार्थ्यांना शिक्षण, समता आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव बाळगण्याचे आवाहन केले. आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये निवडक वक्त्यांनी विद्यापीठाच्या स्थापनेपासून नामांतर लढ्यापर्यंतचा इतिहास उलगडून दाखवला. त्यांनी या लढ्याचे नेतृत्व, सामाजिक संदर्भ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या



विचारांचा प्रभाव अधोरेखित केला आणि विद्यार्थ्यांना जागरूक, जबाबदार व सक्रिय नागरिक होण्याचे संदेश दिले. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजकांनी उपस्थित सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख प्रा. मंदार चौधरी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या शिक्षक, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. प्राचार्य डॉ. संतोष तरके यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या अभिनंदनासह आपले विचार मांडताना सांगितले की, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, नेतृत्वगुण आणि राष्ट्रप्रेमाची भावना बळावते. विद्यापीठाचा गौरवशाली इतिहास विद्यार्थ्यांसाठी प्रेरणेचा स्रोत ठरतो, ज्यातून ते समाजासाठी सकारात्मक योगदान देऊ शकतात. या वेळी बी. फार्मसी महाविद्यालयातील डॉ. गितांजली चव्हाण, काव्या रेड्डी, अश्विनी घोळकर, मंजुषा करेप्पा, अमर कावरे, विशाल साखरे, इम्रान सय्यद, मामूण कुरेशी, गणेश गिरी, ज्योती मुरकुटे तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# डॉ.नाथ डेंटल क्लिनिकच्या १७ व्या वर्धापन दिनानिमित्त डेंटल इम्प्लांट व मोठ्या उपचारांवर १७% सूट

आष्टी (प्रतिनिधी)

सर्व सोयी सुविधा असलेले कडा, ता. आष्टी, जि. बीड शहरातील सुसज्ज असे डॉ. महेश नाथ यांचे डॉ. नाथ डेंटल क्लिनिक सुपर स्पेशालिटी डेंटल व इम्प्लांट सेंटर येथे डॉ. नाथ डेंटल क्लिनिकच्या १७ व्या वर्धापन दिनानिमित्त डेंटल इम्प्लांट व मोठ्या उपचारांवर १७ % सूट उपलब्ध आहे.



डॉ. नाथ डेंटल क्लिनिक येथे दात काढणे, अँडवान्स रूट कॅनल ट्रिटमेंट, वेडेवाकडे दात सरळ करणे, हिरड्यांच्या आजारांवर उपचार, फिक्स व काढघालीचे दात बसवणे, लहान मुलांच्या दातांवर उपचार, सिमेंट व चांदी बसवणे, दात साफ करणे, पिवळ्या दातांवर उपचार, इंट्राओरल ३ डी, स्कॅनर उपलब्ध, डिजिटल कॉम्प्युटर एक्स रे, स्माईल डिझाईनींग आदी उपचार सुविधा उपलब्ध आहेत.

बीड जिल्ह्यातील पहिले १०० % डिजिटल क्लिनिक, डेंटल इम्प्लांट व अक्कल दाढ ऑपरेशन असे उपचार करणारे आष्टी तालुक्यातील एकमेव क्लिनिक असून सोमवार ते शुक्रवार या दिवशी नियमित वेळ सकाळी १० ते रात्री ८ पर्यंत सेवा दिली जाते. तसेच दर शनिवारी क्लिनिक बंद असते. अधिक माहितीसाठी डॉ. आंबेडकर चौक, कडा, ता. आष्टी, जि. बीड, येथे भेट देवून सदरील मोबाईल नंबर वर ९७६३०६९१११ संपर्क करावा. असे डॉ. नाथ डेंटल क्लिनिकच्या वतिने कळविले आहे.

# दर्श, पिठोरी अमावस्येनिमीत्त काडीवडगावच्या शनी, मारोती मंदिरात महापंगत

माजलगाव (प्रतिनिधी)

शहरातील काडीवडगाव नं. २ मंजरथ रोड भागात असलेल्या श्री. शनिदेव व मारोती मंदिरात दर्श, पिठोरी अमास्यानिमीत्त भजन व महापंगत मोठ्या उत्साहात दि. २२ ऑगस्ट रोजी झाली. प्रति अमावस्येला या मंदिरात महाप्रसादाचे आयोजन केले जाते तर भाविकांची मोठी गर्दी देखील या मंदिरात पहायला मिळते. त्यामुळे हे श्री शनिदेव व मारोती मंदिर या भागातील रहिवाशांचे श्रध्दास्थान बनले आहे. माजलगाव शहरातील मंजरथ रोड भागात असलेल्या श्री शनि मंदिरात दर्श पिठोरी अमावस्या



निमित्त भजनाचा व महापांगतीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात दि. २२ ऑगस्ट रोजी झाला. यावेळी कार्यक्रमात सहभागी ह भ प. कल्याण शेंडगे, सटवा काळे, नाथा महाराज जाधव, कुलथे महाराज, पांचाळ महाराज, शिवाजी घायतीडक, गवते महाराज, मोरे महाराज, फपाळ महाराज , पवार महाराज, ठोंबरे महाराज, कर्डिले महाराज, पवार महाराज, अस्वले महाराज, चिगुरे महाराज, महेश बादाडे, मृदंगाचार्य विष्णु महाराज बादाडे, विठ्ठल क्षीरसागर कार्यक्रमाचे संयोजक विक्रम राऊत व अन्नदाते अरुण शिराळकर व भाविक महिला देखील उपस्थित होत्या.

# विश्वनाथ मंदिरातील शिवमहापुराण कथा सोहळ्याची सांगता

शिवभक्तांनी माऊली समूहाचे आभार मानले

वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी शहरातील तहसील कार्यालयाच्या पाठीमागे युवा उद्योजक विनोदशेठ आसलकर यांनी स्वतःच्या जागेत उभारलेल्या श्री.विश्वनाथ मंदिर याठिकाणी श्रावण मासाचे औचित्य साधून भव्य अशा शिवमहापुराण कथाचे आयोजन दि.१५ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजीपासून करण्यात आले होते. तर या कार्यक्रमाची सांगता दि.२१ ऑगस्ट २०२५ गुरुवार रोजी संपन्न झाली. या शिवमहापुराण कथेच्या श्रवणासाठी सात दिवस विश्वनाथ मंदिराचा परिसर गर्दीने तुडुंब भरला होता. याप्रसंगी वडवणीसह पंचक्रोशीतील शिवभक्त व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांची उपस्थिती तर लक्षणीय होती. शेवटी सर्वांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी शहरातील तहसील कार्यालयाच्या पाठीमागे येथील वस्त्रोद्योग क्षेत्रातील नामांकित युवा उद्योजक विनोदशेठ आसलकर यांनी स्वतःच्या जागेत उभारलेल्या श्री.विश्वनाथ शंभू महादेवाचा परिसर हा नेहमीच शिवभक्तांच्या गर्दीने भरलेला असतो. याच ठिकाणी महाराष्ट्रातील नामांकित किर्तनकार ह.भ.प.राजाभाऊ महाराज म्हेत्रे जामखेड यांच्या मार्गदर्शनाखाली श्रावण मासाचे औचित्य साधून भव्य अशा शिवमहापुराण कथाचे आयोजन दि.१५ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजीपासून दैनंदिन दुपारी २ ते ५ या वेळेत करण्यात आलेले होते. त्याचप्रमाणे सायंकाळी ५ ते ७ या वेळेमध्ये हरिपाठ व महिलांचा फुगड्यांचा यांचा कार्यक्रम देखील उत्साहात संपन्न झाला यामध्ये दररोज असंख्य महिलांनी अत्यंत उल्हासाने सहभाग घेतला होता. ज्या महिला भक्ताने अतिशय सुंदर अशा प्रकारे




फुगडी खेळली त्यांना माऊली समूहाच्या वतीने दररोज एक छान व सुंदर अशी पैठणीही भेट म्हणून देण्यात आली. महाराष्ट्रातील नामांकित शिवमहापुराण कथा प्रवक्ते ह.भ.प.दत्तात्रय महाराज हूके साकतकर यांच्या कर्णमधुर वाणीतून या शिवमहापुराण कथेची भव्यता अगदी सुक्ष्मपणे भाविकांच्या मनावर बिंबली आहे. याप्रसंगी हरिपाठ नेतृत्व संगीत विशारद ह.भ.प.हरिभाऊ महाराज काळे, साथ संगत गायन गंधर्व ह.भ.प.सतीश महाराज खपके, मृदंगाचार्य ह.भ.प.बाबा महाराज मुरुमकर यांची त्यांना साथ लाभली. दरम्यान शिवमहापुराण भगवान शंकर आणि त्यांच्या अवताराशी निगडीत आहे. त्यात शिव भक्ती, शिव महिमा आणि शिवाचे संपूर्ण जीवन चरित्र वर्णिले आहे. त्याच बरोबर ज्ञान, मोक्ष, उपास, तप, जप यांचा मिळणाऱ्या फळांचे देखील वर्णन आढळतं. शिव महापुराणामध्ये सहस्त्र ज्ञानवर्धक आणि भक्ती विषयक लिहिलेले असून याविषयी सविस्तर असे वर्णन केलेले आहे. तरी वडवणीकरांसाठी हा शिवमहापुराण कथा सोहळा म्हणजे मोठी अध्यात्मिक पर्वणीच ठरली आहे. या कथेची सांगता दि.२१ ऑगस्ट २०२५ गुरुवार रोजी झाली. यादिवशी सकाळी ९ ते १० या वेळेमध्ये शिवमहापुराण कथा संपन्न झाली, त्यानंतर सकाळी १० ते १२ या वेळेमध्ये ह.भ.प.दत्तात्रय महाराज हूके साकतकर यांचे काल्याचे किर्तन झाले व त्यानंतर लागलीच महाप्रसादाची पंगत सुरु करण्यात आली. दरम्यान आपल्या लेखणीच्या माध्यमातून या अध्यात्मिक कार्याला अधिकतेने उजाळा देणारे वडवणी तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांचाही संयोजकांनी आभार सत्कार करुन त्यांचे आभार मानले. सांगतेच्या या कार्यक्रमाला वडवणीसह पंचक्रोशीतील सर्व शिवभक्त, असंख्य मान्यवर, राजकीय, सामाजिक, अध्यात्मिक, क्षेत्रातील पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार, व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिवमहापुराण कथेच्या श्रवणासाठी सात दिवस विश्वनाथ मंदिर परिसर गर्दीने फुलून गेला होता. याप्रसंगी वडवणीसह पंचक्रोशीतील शिवभक्त व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांची उपस्थिती तर लक्षणीय होती. शेवटी सर्वांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला. शेवटी सर्व उपस्थितांचे आभार संयोजक विनोद विश्वासराव आसलकर, विक्की विश्वासराव आसलकर व समस्त माऊली समूह यांच्या वतीने मानण्यात आले.

# जरांगे पाटलांच्या आंदोलनास बहुजन विकास मोर्चाचा जाहिर पाठींबा

मुंबईच्या आंदोलनात पूर्ण ताकतीने सामील होणार

माजलगाव (प्रतिनिधी)

संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबई येथे दि. २९ ऑगस्टला होणा-या आंदोलनास बहुजन विकास मोर्चा महाराष्ट्र राज्य च्या वतीने संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांच्या नेतृत्वाखाली जाहिर पाठींबा देत मुंबईच्या आंदोलनात पूर्ण ताकदीने सामील होणार असल्याचे बहुजन विकास मोर्चाचे जेष्ठ नेते तथा बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांनी सांगीतले आहे.

मराठा आरक्षण आंदोलनाच्या सुरूवातीपासुन बहुजन विकास मोर्चाच्या वतीने मराठा आरक्षणावर राज्यभर ठिकठिकाणी झालेल्या सभा, बैठका, आंदोलनाला पाठींबा देत जरांगे पाटलांच्या मागे ताकद उभी करण्याचे काम बाबुराव पोटभरे यांनी केलेले आहे तर उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांनी पुरूषोत्तमपुरी ग्रामपंचायतीच्या मतदानावर बहिष्कार टाकत मराठा आरक्षण आंदोलनास पाठींबा दिला. सुमारे दिड वर्षांपासुन ग्रामपंचायतीवर प्रशासक राज आहे. त्याचबरोबर मराठा आरक्षण आंदोलनात तन, मन, धनाने नेहमी बहुजन विकास मोर्चाच्या वतीने सहभाग नोंदविलेला आहे. बाजार समितीमध्ये आंदोलनाच्या समर्थनाथ उपोषण



देखील करण्यात आले होते. आता येत्या २९ ऑगस्टला असलेल्या चलो मुंबई आंदोलनास देखील बहुजन विकास मोर्चाच्या वतीने पाठींबा जाहिर करत पूर्ण ताकदीने सामील होणार असुन आम्ही येतोय....तुम्ही पण या... असे आवाहन बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे, उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांचेसह त्यांच्या कार्यकर्त्यांनी केले आहे.

# एसपी साहेब! शनिशिंगणापूर पोलिसांची एकदा कानउघडणी कराच!

## वर्दीचा धाक दाखवत दुकानदारांकडून खंडणी वसूल करणाऱ्या 'त्या' पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवाच!

प्रशांत बाफना जिल्हा प्रतिनिधी / अहिल्यानगर

शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात ठराविक पोलीस कर्मचाऱ्यांची एक 'चौकडी' असून खाकी वर्दीचा धाक दाखवत ही 'चौकडी' नेवासे तालुक्यातल्या काही दुकानदारांकडून खंडणी उकळवित असल्याची जोरदार चर्चा ऐकायला मिळत आहे. या पोलीस ठाण्याच्या हद्दीतल्या शनिशिंगणापूर, वडाळा बहिरोबा, रस्तापूर या परिसरातल्या अनेकांना या 'चौकडी'पासून प्रचंड मनस्ताप सहन करावा लागल्याची वदंता आहे. या सर्व पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांना जाहीर आवाहन करत आहोत, की आपण एकदा या पोलिसांची कानउघडणी कराच. हे करत असताना वर्दीचा धाक दाखवत दुकानदारांकडून खंडणी वसूल करणाऱ्या या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना नक्कीच सक्तीच्या रजेवर पाठवा.

शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यातल्या या 'चौकडी'कडून छोट्या छोट्या व्यावसायिकांची आर्थिक लूट केली जात असल्याचं या तालुक्यात उघडपणे बोललं जात आहे. हा प्रकार नक्की काय आहे, याची पोलीस अधीक्षक घार्गे यांनी खरं तर गोपनीय चौकशी करण्याची आवश्यकता आहे. या व्यवसायिकांना कायद्याचा आणि संभाव्य शिक्षेची भिती दाखवत ही 'चौकडी' संबंधित व्यावसायिकांसमोर आर्थिक 'तडजोड' करण्याचा प्रस्ताव ठेवते. मात्र तो मान्य न केल्यास तुरुंगात डांबण्याची धमकीसुद्धा देत असल्याचं काही व्यावसायिकांनी नाव न सांगण्याच्या अटीवर खासगीत बोलताना सांगितलं.

व्यावसायिक बांधवांनो! दुकानात 'तसले' सीसीटीव्ही कॅमेरे बसवा!

अहिल्यानगर जिल्हा पोलीस दल विशेषतः स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस अधिकारी आणि कर्मचारी अत्यंत प्रामाणिकपणे रात्रंदिवस दमदार कामगिरी करत आहेत. गुन्हेगारीचं प्रमाण कमी करण्यासाठी आणि गुन्हा करुन फरार झालेल्या गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यासाठी अहोरात्र मेहनत घेत आहेत. दुसरीकडे काही पोलीस मात्र स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी व्यवसायिकांना धमकावत खाकी वर्दीला कलंक लावत आहेत. याबद्दल नेवासे तालुक्यातल्या व्यावसायिकांमध्ये उलट सुलट चर्चा असली तरी पोलीस आणि न्याय यंत्रणेला पुराव्यांची आवश्यकता असते. यासाठी नेवासे तालुक्यातल्या व्यावसायिकांना या बातमीच्या माध्यमातून आवाहन करत आहोत, की प्रत्येकाने आपल्या दुकानात चित्रीकरणासह संभाषण 'रेकॉर्ड' करणारे सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत.

व्यावसायिक मित्रांनो, कोणताही अधिकारी किंवा पोलीस कर्मचारी तुम्हाला कायद्याची भीती दाखवत असेल किंवा तुम्हाला तुरुंगात डांबण्याची धमकी देत असेल तर त्या संबंधित पोलीस अधिकारी किंवा कर्मचाऱ्याला एकच प्रश्न विचारा, 'आम्ही देशद्रोही आहोत का

# पत्रकाराचा अभिमान बरं झालं...

पत्रकार झालो..!

नाहीतर आज मीही कोणत्या तरी पक्षाचा झेंडा घेऊन कोणत्या तरी आंदोलनात सहभागी झालो असतो.पत्रकारांचे आयुष्य तसे थोडे त्रासदायकच आहे,पण जगापासून वेगळे आहे.पत्रकार झाल्याने जग कसे आहे ते समजले,पत्रकार झालो तेंव्हा सर्व जातीची लोकं माझ्यासोबत होती.आणि आता मीही माझी जात विसरलोय.माझी एकच जात आहे. पत्रकार अभिमान आहे मला मी पत्रकार असल्याचा पत्रकार म्हणजे काय...?पत्रकार म्हणजे फीरता वारा... पत्रकार म्हणजे वाहता झरा... पत्रकार म्हणजे अंधारात चमकणारा तारा...पत्रकार अंगावरील शहारा...

पत्रकार सुख-दु:खाचा सहारा.पत्रकार जनहिताचा नारा. पत्रकार आहे अनमोल हिरा. पत्रकार म्हणजे धाक-दरारा. त्याचाच आहे वचक सारा. काहीही करू शकतो पत्रकार जर असेल तो नीतीनं खरा पत्रकारांवर प्रेम करून पाहा. कसा जगतो एकटा तुम्ही चोरून पहा. प्रेमाचे दोन शब्द त्याच्याशी बोलून पहा. त्याच्या सारख्या यातना एकदा तरी सोसून पहा. अनोळखी जगात तुम्ही एकटे बसून पहा. दु:ख असुन मनात तुम्ही हसून पहा. त्याच्या सारखे उन्हात फिरून पहा. लेकरांसाठी झुरतो तो तसं भेटीसाठी झुरून पहा. तुम्हाला काय वाटतं. पत्रकारांच्या यातना सोसून पहा. एकदा तरी पत्रकारांवर...

तुम्ही प्रेम करून पाहा...!

सर्व पत्रकार बंधूंना समर्पित

प्रशांत बाफना अहिल्यानगर जिल्हा प्रतिनिधी ८०५५४४०८५

# सिंगणापूर ग्रामसभेत दारूबंदीचा ठराव मंजूर

परभणी ।प्रतिनिधी



तालुक्यातील सिंगणापूर गावाने अखेर तळीरामांच्या त्रासाला कंटाळून दारूबंदीचा ठराव मंजूर केला आहे. रविवारी झालेल्या ग्रामसभेत गावाच्या महिला सरपंच शारदा पांडुरंग खिल्लारे यांच्या अध्यक्षतेखाली हा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. ग्रामसभेत ठराव पारित करण्यापूर्वी गावातील २०० हून अधिक महिलांनी स्वाक्षऱ्या करून दारूबंदीला पाठिंबा दिला. विशेष म्हणजे, या ठरावानुसार गावात दारू विकणाऱ्यास ५ हजार रुपये दंड तर दारू पिणाऱ्यास १ हजार रुपये दंड आकारला जाणार आहे.

गावातील महिलांनी दोन दिवसांपूर्वी प्रहार जनशक्ती पक्षाच्या माध्यमातून पोलीस अधीक्षकांना निवेदन देऊन अवैध दारू विक्री बंद करण्याची मागणी केली होती. मात्र पोलिसांकडून ठोस कारवाई होत नसल्याने अखेर महिलांनीच ग्रामसभेत ठराव मंजूर करून गावात दारूबंदी लागू करण्याचा निर्धार केला.

गावात दारूच्या आहारी गेलेल्या तळीरामांमुळे वयोवृद्ध व महिलांना सतत त्रास सहन करावा लागत होता. त्यामुळे वादावादी व गोंधळाचे प्रकार घडत होते. हा सर्व प्रकार थांबवण्यासाठी गावकऱ्यांनी एकजुटीने दारूबंदीचा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले.ग्रामसभेस सोनाली खिल्लारे, सीमा कदम, गीता कदम, कालींदा आंधळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पांडुरंग खिल्लारे, ग्रामसेवक राम पवार तसेच मोठ्या संख्येने महिला व पुरुष ग्रामस्थ उपस्थित होते.सिंगणापूर ग्रामसभेचा हा निर्णय इतर गावांसाठीही एक आदर्श ठरणार असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

# परभणीत आज भव्य रक्तदान शिबीर; प्रजापिता ब्रम्हकुमारी केंद्रातर्फे आयोजन

परभणी ।प्रतिनिधी

राजस्थान मधील माउंट अबू स्थित प्रजापिता ब्रह्माकुमारीज संस्थेच्या माजी मुख्य प्रशासिका राजयोगिनी दादी प्रकाशमणी यांच्या १८ व्या पुण्यतिथी व विश्वबंधुत्व दिनाच्या निमित्ताने सोमवारी (दि.२५) सकाळी ९ वाजता रक्तदान शिबिर आयोजित केले आहे. ब्रह्माकुमारीज केंद्र, ओम निवास, शिवराम नगर फड पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, वसमत रोड परभणी येथे होणाऱ्या या शिबिराचे उदघाटन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.सदानंद भिसे यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती परभणी जिल्हा केंद्र संचालिका ब्रह्माकुमारी अर्चना दीदी यांनी दिली आहे.

याप्रसंगी लॉयन्स क्लबचे झोनल चेयर पर्सन तथा सेवानिवृत्त उपविभागीय कृषी अधिकारी पंडित बरदाळे, परभणी जिल्हा केंद्र संचालिका ब्रह्माकुमारी अर्चना दीदी, वरिष्ठ राजयोगी ब्रह्मकुमार तांदळे भाई यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. प्रजापिता ब्रह्माकुमारीज संस्थेतर्फे भारतासह नेपाळात रक्तदान महाअभियान राबवून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड नोंदविण्यात येणार आहे. या महाअभियानाचा राष्ट्रीय शुभारंभ १७ ऑगस्ट रोजी नवी दिल्ली येथे केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांच्या हस्ते करण्यात आला. राष्ट्रीय शुभारंभानंतर भारत व नेपाळमध्ये रक्तदान शिबिरांना सुरुवात झाली. त्यानंतर देशभरातील सहा हजारांहून अधिक सेवा केंद्रांवर एकाच वेळी दि. २२ ते २५ ऑगस्ट दरम्यान विशाल रक्तदान शिबिरे होणार आहेत. ज्या सेवा केंद्रांवर रक्तदान शिबिरे आयोजित केली जातील, त्यांची मॉनिटरिंग गुगल मॅपद्वारे केली जाईल. यासाठी एक गुगल फॉर्म तयार करण्यात आला आहे, ज्यामध्ये रक्तदानाचे ठिकाण, वेळ, दिनांक, गुगल मॅप, रक्तदात्यांची संख्या, सेवा केंद्र प्रमुखाचे नाव, सहयोगी संस्थांची नावे आदी संपूर्ण माहिती भरली जात आहे, जेणेकरून रक्तदान महाअभियानानंतर डेटा संकलन सुलभ होईल. महाराष्ट्रातही विविध सेवाकेंद्रामार्फत भव्य रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. ब्रह्माकुमारीजच्या समाज सेवा प्रभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या या महाअभियानासाठी भारत सरकारचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, जिल्हा रक्तपेढी, जिल्हा सरकारी रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय, रोटरी इंटरनॅशनल क्लब, लायन्स क्लब, आयएसबीटीआय यांच्या सहकार्याने स्थानिक पातळीवर रक्तदान शिबिरे घेतली जात आहेत. हा पहिलाच प्रसंग आहे की एखाद्या आध्यात्मिक संस्थेमार्फत एवढ्या मोठ्या प्रमाणावर रक्तदान अभियान राबवले जात आहे. परभणीत आयोजित केलेल्या या शिबिरात मोठ्या संखेने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा संचालिका ब्रह्माकुमारी अर्चना दीदी यांनी केले आहे.

# मुक्रमाबाद पोलिस ठाण्याच्या वतीने शांतता कमिटीची बैठक

## गणेश उत्सव व ईद- ए- मिलाद शांततेत साजरे करावेत ...स.पो.नि.राजेश चव्हाण यांचे आव्हान

मुक्रमाबाद ।प्रतिनिधी

आगामी गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद या सणांच्या पार्श्वभूमीवर मुक्रमाबाद पोलिस स्टेशनच्या वतीने शांतता कमिटीची बैठक शनिवारी पार पडली. या बैठकीत सहायक पोलिस निरीक्षक राजेश चव्हाण यांनी उपस्थितांना संबोधित करताना प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन केले. चव्हाण म्हणाले, सण-उत्सव हे सर्व धर्मीयांसाठी आस्थेचे आणि जिव्हाळ्याचे असतात.मात्र या काळात कोणीही कायदा व सुव्यवस्थेचा भंग करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. अशा



प्रकारच्या गोष्टींना कधीही गय केली जाणार नाही. ते पुढे म्हणाले की, सणांचा खरा उद्देश लोकांना एकत्र आणणे, हे विसरू नये. जात-पात किंवा धर्माच्या नावावर तेढ निर्माण होऊ न देता, सण सर्वांनी मिळून शांततेत साजरे करावेत. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करूनच उत्सव पार पडले पाहिजेत. या बैठकीत शांतता कमिटीचे अध्यक्षपद सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेश चव्हाण यांनी भूषवले. यावेळी पोलीस पाटील व्यंकट सुवर्णकार ग्रामपंचायत सदस्य बालाजी बोधने, बालाजी पसरगे, शिवदास बोधने,तंटामुक्ती अध्यक्ष गौसखाँ पठाण, मगदूम पठाण,रहेमतुल्ला तांबोळी पत्रकार शाकीर काजी रज्जाक कुरेशी यांची प्रमुख उपस्थिती होती.गावातील गणेश मंडळाचे अध्यक्ष व सदस्यही उपस्थित होते.

# गुणवंत विद्यार्थी सत्कार व राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार सोहळा

परभणी ।प्रतिनिधी

गुरु रविदास चॅरिटेबल ट्रस्ट परभणी व अदित्य सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच गुरु रविदास महिला सहकारी पतसंस्था नांदेड यांच्या सहकार्याने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्यंकटराव दुधांबे (अध्यक्ष, अदित्य सेवाभावी संस्था परभणी) होते. उद्घाटक म्हणून राज्यमंत्री सौ. मेघनाताई बोर्डीकर उपस्थित होत्या.

प्रमुख अतिथी म्हणून माजी मंत्री सुरेशराव वरपुडकर, भाजपा महानगराध्यक्ष शिवाजी भरोसे, डॉ.




लक्ष्मण खंडेकर, राजू एकडे आदी उपस्थित होते. प्रमुख वक्ते म्हणून संजय खामकर व लक्ष्मणराव घुगे यांनी सामाजिक ऐक्य, शिक्षणाचे महत्व आणि भारतीय संविधानाच्या तुलनात्मक अभ्यासावर भाष्य केले.या कार्यक्रमात राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजभूषण व्यक्तींना पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्याचबरोबर परभणी जिल्ह्यासह मराठवाड्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना शैक्षणिक वाटचालीसाठी प्रेरित करण्यात आले.स्वागताध्यक्ष म्हणून गोपीचंद गुरव (सचिव, अदित्य सेवाभावी संस्था परभणी) तर संयोजक म्हणून अंकुश जोगदंड (संपर्क प्रमुख, गुरु रविदास चॅरिटेबल ट्रस्ट परभणी) यांनी काम पाहिले. गुरु रविदास चॅरिटेबल ट्रस्ट परभणी व अदित्य सेवाभावी संस्था यांनी सामाजिक सलोखा, शिक्षण व प्रेरणा देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी मनापासून कौतुक केले.

# निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे परळीतील प्रभाग रचना करा - बालाजी जगतकर

## शहरातील अनेक वस्त्यांचे विभाजन करून जुनी प्रभाग रचना नवीन प्रभाग रचना करण्यासाठी नगर परिषदेतकडे आक्षेप, हरकती नोंदवा...

बीड / परळी

परळी शहरातील सर्वच मागासवर्गीय वस्त्यांची विभाजन करून जुनी प्रभावी रचना केली आहे. ती बदलून नवीन प्रभाग रचना करा त्यामध्ये प्रामुख्याने भिमनगर, जगतकर गल्ली, प्रबुद्ध नगर, रोडे गल्ली ताटे गल्ली आरोग्य गल्ली, रमानगर, या वस्ती आहे अनुसूचित जातीच्या आहेत. त्या भागाचे विभाजन टाळून अनुसूचित जातीच्या प्रभागात समावेश करावा यासाठी जवळपास १०० पेक्षा जास्त मतदारांनी व या भागात राहणाऱ्या लोकांनी हरकती, आक्षेप नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांच्याकडे नोंद करायला सुरुवात केली आहे. व आक्षेपी व हरकती नोंद सुरूच आहेत ३१ ऑगस्ट पर्यंत त्या नोंदवल्या जाणार आहेत.

या अगोदर देखील दि. १९/६/२०२५ या तारखेला निवेदन दिलेली आहे. अनुसूचित जाती या समाजाचा असल्यामुळे दलित वस्ती व इतर योजनेपासून वंचित ठेवत आहात प्रभाग क्रमांक पाच (५) गणेशपार, कालरात्री देवी मंदिर परिसर, यात आपण जगतकर गल्ली, गणेश पारपरिसर, काळाराम मंदिर परिसर, व आंबेवेस या प्रभागात अनुसूचितजाती लोकसंख्या ६५७, अनुसूचित जमातीची लोकसंख्या ०६, व प्रभाग क्रमांक १६ या प्रभागात आपण अनुसूचित जाती लोकसंख्या ५७७, अनुसूचित जमाती ७६ लोखसंख्या आहे. या दोन प्रभागाची अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या एकत्र केल्यास १२०० आहे तेव्हा या निवेदनावर माझा असा आरोप आहे की आपण प्रभाग क्रमांक ५. प्रभाग क्रमांक ६ या दोन्ही प्रभागाचे मते विभागून आपण कोणा तरी राजकीय पक्षाला मदत करत आहात. आपणास पुनश्च विनंती आहे



की निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे म्हणजे वार्डाची लोकसंख्या ही अध्यापेक्षा जास्त अनुसूचित जातीची असावी, व ५.५.३ प्रभाग रचना मार्गदर्शन तत्त्व ५.५.३ व अनुसूचित जाती ऑब्लिक अनुसूचित जमाती यांच्या वस्तीचे शक्यतोवर विभाजन होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी असे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी मुंबई यांनी दिलेले असतानाही परळी नगरपालिका प्रशासन, परळी निवडणूक अधिकारी व प्रस्थापित राजकीय नेते आमदार, खासदार यांच्या सांगण्यावरून त्यांचे त्यांच्या सोयीप्रमाणे प्रभाग रचना करत आहेत व केली आहे. यामुळे राजकीय अन्याय तर होतच आहे पण आमच्या अधिकाऱ्यापासून आम्हास वंचित ठेवत आहात. नगरपालिका प्रशासन व प्रस्थापित राजकीय नेते यांनी संगणमत करून जाणीवपूर्वक अशी प्रभाग रचना केली आहे. अनुसूचित जातीच्या वाडांचे विभाजन प्रभाग क्रमांक ०४ प्रभाग क्रमांक ०५ प्रभाग क्रमांक १६ यातील प्रभाग रचनेत केलेले आहे. तेव्हा सदरील प्रभाग रचना पुन्हा करून अनुसूचित जाती व जमातीचा प्रभाग एक करावा अन्यथा आपल्या विरोधात आम्हाला कायदेशीर व सनदशीर मागने न्यायालयात याचिका दाखल करणार आहोत. न्याय न मिळाल्यास कायदेशीर लढाई देखील लढली जाणार आहे.




शिराढोण येथील पारधी पिढी खरा आनंद वंचिता सोबत साजरा केला वाढदिवस साजरा करण्यात आला कळंब तालुक्यातील कर्तव्यदक्ष तहसीलदार हेमंत ढोकळे यांचे कन्या चा वाढदिवस वंचिता सोबत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी पोलीस निरीक्षक धरणी दर कोळेकर उपनिरीक्षक परमेश्वर पवार बजरंग अण्णा ताटे माजी जिल्हा परिषद सदस्य शहाजीराव पाटील लेक लाडकी योजना समितीचे तालुकाध्यक्ष नितीन पाटील मायाताई शिंदे गणेश महाजन सुतार साहेब तलाठी तहसीलदार साहेबांनी आपल्या लाडक्या लेकीचा वाढदिवस एका आगळा वेगळा पद्धतीने साजरा करून समाजासमोर हदय स्पर्शी आदर्श ठेवला आहे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गोड खाऊची वाटप करण्यात आले शिक्षणाचे महत्त्व व समाजातील संवादेनशालतेचा संदेश तहसीलदार साहेबांचा या प्रेरणादायी उपक्रमास कौतुक होत आहे